# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ११/ २०१४** **दिनांक ०३.०८.२०१४**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ०२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दिनांक ०३.०८.२०१४ रोजी सकाळी ०९.०० वाजता संस्थानचे प्रधान लेंडीबागेशेजारील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २१३९/ २०१४, दिनांक ०२ ऑगष्ट, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक ०३.०८.२०१४ रोजी सकाळी ०९.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील प्रधान लेंडीबागेशेजारील साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष.
०२. मा.श्री.कुंदनकुमार सोनवणे, कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २६.०६.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.६११** दिनांक २६.०६.२०१४ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १७.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.६१२** दिनांक १७.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-.

**(०१) निर्णय क्र.५७६ मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, त्रिसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेमध्ये, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिडी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला विषयांकित भूसंपादन कक्ष बंद करणेबाबत झालेला निर्णय क्र.४४३ रद्द करणेत येऊन, सदरचा भू-संपादन कक्ष पुढील एक वर्ष कालावधीसाठी सलग सुरु ठेवणेत यावा. तसेच या कक्षामध्ये त्यांचे मागणीप्रमाणे ०१ कंत्राटी सल्लागार (अव्वल कारकुन) ०२ कुशल व ०१ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येऊन, या कर्मचाऱ्यांना पुर्वीप्रमाणेच मानधन/ महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे वेतन आदा करणेत यावे, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, त्रिसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेमध्ये, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिडी यांचे कार्यालयाचे अधिनस्त असलेला विषयांकित भूसंपादन कक्ष बंद करणेबाबत झालेला निर्णय क्र.४४३ रद्द करणेत येऊन, सदरचा भू-संपादन कक्ष दि.०१.०५.२०१४ पासुन पुढील एक वर्ष कालावधीसाठी सलग सुरु ठेवणेत यावा. तसेच या कक्षामध्ये त्यांचे मागणीप्रमाणे ०१ कंत्राटी सल्लागार (अव्वल कारकुन) ०३ कुशल व ०१ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेत येऊन, या कर्मचाऱ्यांना पुर्वीप्रमाणेच मानधन/ महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे वेतन आदा करणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं. ०३** **दिनांक २१.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६१३** दि.२१.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१. <u>श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा– २०१४ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेले निविदा उघडणेबाबत</u>

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करिल या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

व्यवस्थापन समिती निर्णय:- मा.त्रिसदस्य समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा २०१४ चे कार्यक्रम रुपये ९,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी रु.३,००,०००/- मात्र इतका खर्च मंडप, स्टेज, कमाणी व इतर अनुषंगिक व्यवस्थेकरीता अपेक्षित आहे.

प्रस्तावना:-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सालाबाद प्रमाणे यावर्षीही श्रावणमास निमित्त दि.२७/०७/२०१४ ते दि.०४/०८/२०१४ या कालावधीत श्री साईसच्चरीत पारायण सोहळा साई कॉम्प्लेक्स शेजारील संस्थानचे १६ गुंठे जागेत आयोजित करण्यास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली असल्याचे सामान्य प्रशासन विभाग वशी-५ यांनी दूरध्वनीने इकडील विभागास तोंडी कळविले आहे. तसेच त्यांनी या कार्यक्रमाकरीता मंडप, कमानी, स्टेज व अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणारे रु.३,००,०००/- मात्र अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली असल्याचे कळविले आहे.

सदरहू कार्यक्रमासाठी इकडील विभागामार्फत एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेला डोम टाईप कापडी मंडप, पार्टीशन, स्टेज स्वागत कमानी, मॅटींग, मेकअप रुम बॅरेकेटींग, कनात इ. व्यवस्था करुन घेणेकामी अशा प्रकारचे व्यवस्थेचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून दि.२० जुलै,२०१४ अखेर पर्यंत सिलबंद निविदा मागविणेस इकडील दि.१०/०७/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे.

प्रस्ताव:- उपरोक्त प्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी दि. १४/०७/२०१४ रोजीचे टिपणी स्थानीक वृत्तपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावरुन प्रसिध्द करणेस करणेस मान्यता देण्यात आले असून त्यानुसार दि.१७/०७/२०१४ रोजीचे वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली असून कोरे निविदा फार्मची विक्री दि.१६ जुलै २०१४ ते १९ जुलै २०१४ अखेर ठेवण्यात आली असून दि.२१ जुलै, २०१४ पर्यंत सिलबंद निविदा सादर करणेचीमूदत ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार खालील मंडप ठेकेदारांनी कोरे कोटेशन फॉर्म विकत घेतले होते.

1. रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी
2. कला साधना डेकोरेटर्स, नाशिक
3. जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद
4. काद्री अॅण्ड सन्स, नाशिक रोड
5. नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर अॅण्ड डेकोरेशन, अकोला
6. कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर
7. स्वतीक मंडप वर्क्स, अहमदनगर
8. मळगंगा मंडप अॅण्ड सप्लायर्स, औरंगाबाद

उपरोक्त पैकी खालील ०६ ठेकेदारांनी विहीत मूदतीत (दि.२१ जुलै, २०१४) अखेर दिलेल्या विहीत मूदतीत सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | ६६१७ | १९/०७/२०१४ |
| ०२ | कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ६६३५ | २१/०७/२०१४ |
| ०३ | मळगंगा मंडप अॅण्ड सप्लायर्स, औरंगाबाद | ६६३४ | २१/०७/२०१४ |
| ०४ | काद्री अॅण्ड सन्स, नाशिक रोड | ६६३३ | २१/०७/२०१४ |
| ०५ | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर अॅण्ड डेकोरेशन, अकोला | ६६३१ | २१/०७/२०१४ |
| ०६ | रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता. राहुरी | ६६३२ | २१/०७/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, अहमदनगर | मळगंगा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, औरंगाबाद | काद्री ॲण्ड सन्स, नाशिक रोड | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता.राहूरी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉटरप्रुफ छत लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फिटींग असलेला डोम टाईप मंडप १६८०० चौ.फुट | एकत्रित दर रु. ४,०८,७०१/- | एकत्रित दर रु. ५,१६,१५०/- | एकत्रित दर रु. ४,६५,८६७/- | एकत्रित दर रु. ६,१४,३५८/- | एकत्रित दर रु. ४,२१,०००/- | एकत्रित दर रु. **३,८६,३७०/-** |
| ०२ | स्टेज व्यवस्था- ३०' x १८' साईजचे स्टेज, स्टेजवर मॅटींग टाकणे ५४० चौ.फुट | | | | | | |
| ०३ | स्वागत कमानी २' x २' साईजचे बॉक्सच्या ०२ नग टाईप कमानी बांधणे | | | | | | |
| ०४ | संपूर्ण मंडपात मॅटींग व सतरंजी टाकणे १६५००० चौ.फुट | | | | | | |
| ०५ | ग्रीन रुम- २०' x १८' साईजची ग्रीन रुम तयार करणे व रुममध्ये मॅटींग टाकणे ३६० चौ. फुट | | | | | | |
| ०६ | मंडपाचे पश्चिम बाजुने ३ फुट उंचीचे रेलींग आवश्यक भक्कम सर्पोटसह करुन देणे | | | | | | |
| ०७ | मंडपाचे पुर्व व पश्चिम बाजूने पुर्ण ६ फुट उंचीची कनात आवश्यक सर्पोट देऊन लावणे. | | | | | | |

**प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि.२७.०७.२०१४ ते दि.०४.०८.२०१४ अखेर ०९ दिवस श्री साईसत्चरित्र पारायण सोहळा- २०१४ साठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी मे.रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता.राहूरी यांचे एकत्रित रु.३,८६,३७०/- मात्र निम्नतम दर आहेत. त्यांनी दिलेल्या दरामध्ये आणखी सुट मिळणेच्या उद्देशाने मे.रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर, ता.राहूरी यांना समक्ष सभेमध्ये चर्चेसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे अंतीम दर दिले.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर ता.राहूरी. | |
|---|---|---|---|
| | | मुळ एकत्रित दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला एकत्रित दर रु. |
| ०१ | वॉटरप्रुफ छत लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फिटींग असलेला डोम टाईप मंडप १६८०० चौ.फुट | ३,८६,३७०/- | **३,२१,०००/-** |
| ०२ | स्टेज व्यवस्था- ३०' x १८' साईजचे स्टेज, स्टेजवर मॅटींग टाकणे ५४० चौ.फुट | | |
| ०३ | स्वागत कमानी २' x २' साईजचे बॉक्सच्या ०२ नग टाईप कमानी बांधणे | | |
| ०४ | संपूर्ण मंडपात मॅटींग व सतरंजी टाकणे १६५००० चौ.फुट | | |
| ०५ | ग्रीन रुम- २०' x १८'साईजची ग्रीन रुम तयार करणे व रुममध्ये मॅटींग टाकणे ३६० चौ.फुट | | |
| ०६ | मंडपाचे पश्चिम बाजुने ३ फुट उंचीचे रेलींग आवश्यक भक्कम सर्पोटसह करुन देणे | | |
| ०७ | मंडपाचे पुर्व व पश्चिम बाजूने पुर्ण ६ फुट उंचीची कनात आवश्यक सर्पोट देऊन लावणे. | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी मे.रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर, ता.राहूरी यांचे एकत्रित रु.३,२१,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच, सदरहू कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास, ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देणेत यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **दिनांक २४.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६१४** दि.२४.०७.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**१. पुस्तके/ फोटो छपाईकामी न्युनतम दर असलेल्या प्रेसधारकांना दर निश्चीत करणेकामी बोलाविणेबाबत.**

प्रकाशने विभागाकडील साठा संपत आलेली पुस्तके/फोटोंचे पुर्नमुद्रणासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन ऑनलाईन निविदा प्रपत्रे मागविणत आली होती. जाहिरातीतील व निविदा प्रपत्रासोबत विहित केलेल्या शर्ती/अटीनुसार प्रथम मुदतीअखेर प्राप्त १५ निविदाधारकांचा लिफाफा नं.१ (Technical Bid) मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले व प्री ऑडीटर यांचेकडून कागदपत्रांचे अवलोकन होऊन पात्र निविदाधारकांची यादी तयार करण्यात आली. खालील पात्र १२ निविदाधारकांचा ऑन लाईन लिफाफा नं.२ (Commercial Bid) दि.१७.०७.२०१४ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेत, पात्र १२ निविदाधारकांपैकी खालील ८ निविदाधारकांनी २५ प्रकारचे पुस्तके व ४ प्रकारचे फोटोंचे न्युनतम दर भरलेले आहेत, त्यांचे नमुद केलेल्या दरापेक्षा काही प्रमाणात दर कमी करतील का? याबाबत खात्री करणेकामी दि.२४.०७.२०१४ रोजी सायंकाळी ६.०० वा शिर्डी येथे बोलविणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष दि.२२.०७.२०१४ रोजी सायंकाळी ७.३० वाजता चर्चा झालेनुसार संबंधीत न्युनतम दर असलेल्या ८ निविदाधारकांना आज दि.२३.०७.२०१४ रोजी दुरध्वनीवरुन हजर रहाणेबाबत कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स,अहमदनगर |
| ०२ | चेरी ऑफसेट प्रा.लि.,सोलापूर |
| ०३ | सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर |
| ०४ | जस्मीन आर्ट प्रिंटर्स, प्रा.लि., मंबई |
| ०५ | ओरिऐंट प्रेस लि., मुंबई |
| ०६ | लोकमंगल प्रिंट पॅक लि., सोलापूर |
| ०७ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.,मुंबई |
| ०८ | टॅको व्हीजन प्रा.लि., मुंबई |

तरी पुस्तके/फोटो छपाईकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निम्नतम दरधारकांना अंतीम दर निश्चित करणेकामी समक्ष उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | पुस्तकाचे नांव | छपाई संख्या | प्रती नग न्युनतम दर रु. | चर्चेअंती ठरलेले दर प्रती नग रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | १) श्री साई सच्चरित पोथी - मराठी | ३५००० | ८४.९० | **८१.५०** | २८५२५००.०० |
| | | २) श्री साई सतचरित्र - हिंदी | १००००० | ४०.४० | **३८.७८** | ३८७८०००.०० |
| | | ३) श्री साई सतचरित्र - तेलगू | १००००० | ४३.६० | **४१.८५** | ४१८५०००.०० |
| | | ४) श्री साई सतचरित्र - तामिळ | ६०००० | ५१.२० | **४९.१५** | २९४९०००.०० |
| | | ५) श्री साई तेलगू पुजाविधी आरती | ५०००० | ७.५० | **७.२०** | ३६००००.०० |
| | | ६) श्री साईनाथ स्तवन मंजरी - तेलगू | ३५००० | २.८० | **२.६९** | ९४१५०.०० |
| ०२ | चेरी ऑफसेट प्रा.लि.,सोलापूर | १) श्री साई सतचरित्र - इंग्रजी | ५०००० | ३४.६२ | **३३.२४** | १६६२०००.०० |
| | | २) श्री साई सतचरित्र - गुजराथी | ३०००० | ३९.७६ | **३८.१७** | ११४५१००.०० |
| | | ३) श्री साईचे सत्य चरित्र (गद्यात्मक) मराठी | १५००० | १००.८० | **९६.७७** | १४५१५५०.०० |
| | | ४) श्री साई समर्थ चरित्र (झरीन) इंग्रजी | २००० | ११९.०८ | **११४.३२** | २२८६४०.०० |
| | | ५) श्री साई सतचरित्र तेलगू पोथी | ५००० | १०५.१५ | **१००.९४** | ५०४७००.०० |
| ०३ | सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर | १) श्री साईंचे सत्य चरित्र (गद्यात्मक) गुजराथी | १००० | १४९.७५ | **१४९.७५** | १४९७५०.०० |
| | | २) साईबाबा ऑफ शिर्डी प्रधान- इंग्रजी | २५०० | ९.५८ | **९.००** | २२५००.०० |
| | | ३) श्री साईनाथ स्तवन मंजरी- गुजराथी | ३००० | ३.४० | **३.००** | ९०००.०० |
| | | ४) श्री साईनाथ भजनमाला- हिंदी | २००० | ३२.२५ | **३२.२५** | ६४५००.०० |
| ०४ | जस्मीन आर्ट प्रिंटर्स, प्रा.लि., मंबई | १) मुलांचे साईबाबा - हिंदी | २५००० | ५.७५ | **५.७५** | १४३७५०.०० |
| | | २) मुलांचे साईबाबा इंग्रजी | ५००० | ८.१८ | **८.१५** | ४०७५०.०० |
| | | ३) मुलांचे साईबाबा तामिळ | ७००० | ६.९५ | **६.९०** | ४८३००.०० |
| | | ४) श्री साईबाबा चित्रावली मराठी/ इंग्रजी | २०००० | ४.९९ | **४.९९** | ९९८००.०० |
| ०५ | ओरिऐंट प्रेस लि., मुंबई | १) श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान -मराठी | ३००० | १८.०० | **१७.२८** | ५१८४०.०० |
| | | २) श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान -गुजराथी | १००० | २६.०० | **२४.९६** | २४९६०.०० |
| ०६ | लोकमंगल प्रिंट पॅक लि., सोलापूर | १) श्री साईनाथ स्तवन मंजरी इंग्रजी | ७००० | ३.७० | **३.५५** | २४८५०.०० |
| | | २) गुरुपाठाचे अभंग -मराठी | २५०० | २.९० | **२.७८** | ६९५०.०० |
| ०७ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.,मुंबई | १) श्री साईनाथ सगुणोपासना हिन्दी | ४०००० | ९.९० | **९.६५** | ३८६०००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | टॅको व्हीजन प्रा.लि., मुंबई | १) दगडावर बसलेले बाबा कलर | ५०००० | ३.७५ | **३.६०** | १८००००.०० |
| | | २) कानाला हात लावलेले बाबा - कृष्णधवल | ३०००० | ३.९० | **३.७४** | ११२२००.०० |
| | | ३) थ्रीडी फोटो दगडावर बसलेले बाबा | ५०००० | ३.९० | **३.७४** | १८७०००.०० |
| | | ४) थ्रीडी फोटो फ्रिलीप २.५"x३.५" | ५०००० | ३.९० | **३.७४** | १८७०००.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपसमितीने खालीलप्रमाणे केलेल्या शिफारशी मान्य करणेत आल्या.**

**लोकमंगल प्रिंट पॅक लि.,सोलापूर यांचेकडून श्री साईनाथ सगुणोपासना आरती मराठी या पुस्तकाचा दर रु.३.९० मात्रऐवजी रु.१.९० मात्र असा ऑनलाईन दरपत्रकामध्ये नजरचुकीने भरला गेलेला असून चर्चेअंती प्रती नग रु.३.७५ मात्र हा आमचा अंतीम दर राहील अशी माहिती त्यांचे प्रतिनिधी श्री.हिंगोले यांनी उपसमिती सभेस दिली.**

**सदरहू पुस्तिकेच्या छपाईकामी मागील वर्षीचा दर प्रति नग रु.४.९५ मात्र असा होता, यावरुन त्यांचेकडून नजरचुकीने दर भरला गेला असल्याचे निदर्शनास येते. तसेच सध्या श्री साईनाथ सगुणोपासना मराठी या आरती पुस्तिकांचा साठा संपत आलेला असल्यामुळे, लोकमंगल प्रिंट पॅक लि.,सोलापूर यांनी दिलेला अंतीम दर स्विकारणेबाबत निर्णय होणेसाठी मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत यावा.**

**साईनाथ सगुणोपासना आरती मराठी हे पुस्तक वगळून इतर २४ प्रकारचे पुस्तके व ४ प्रकारचे फोटो छपाईकामी प्रेसधारकांनी चर्चेअंती दिलेले अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०५** **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवादाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः

1. अधिनियम कलम १७ (२) पोट कलम (१) (च) अन्वये विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कादेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणामुळे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील अशी तरतुद आहे.
2. अधिनियम कलम २१ (१) पोट कलम (छ) अन्वये कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमा.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः

1. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६३७.
2. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. १८६.
3. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८१०.
4. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. २९९.

प्रस्ताविकः संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मधील जागेत संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी यांचे निवासाकरीता १२ इमारतींमध्ये ९६ सदनिकांचे बांधकाम सन २००७ मध्ये पूर्ण करणेत आले असून, सदरहू सदनिका संस्थान कर्मचा-यांना निवासासाठी देण्यात आलेल्या आहेत. ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे काम दि. १५/०८/२००७ रोजी पूर्ण झाल्यानंतर व ठेकेदार यांनी अंतिम बिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २१६ (७) अन्वये मान्यता मिळालेनंतर अंतिम बिल अदा करणेत आले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांनी ०१/०४/२००९ चे पत्रान्वये अंतिम बिल व सुरक्षा ठेव स्वीकारलेनंतर रु.२,०७,५०,४४१/- मात्र इतक्या अतिरीक्त रकमेची मागणी केली असून, सदर रक्कम पंधरा दिवसांचे आत न मिळाल्यास आब्रिट्रेशनमध्ये जाणेबाबत कळविले होते.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई मा. न्यायधिश, एस. जे. वजीफदर यांचे समोर दि. २४/०१/२०११ रोजी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी झाली. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. परेश

कपाडीया यांची संस्थान करीता Arbitrator म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचे ऑर्डर झाली असल्याचे निदर्शनास आले होते.

उपरोक्त मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे सुनावणी बाबत संस्थानचे कायदेविषक सल्लागार, अड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडे प्रकरणाचे कागदपत्रासह कोपरगांवी जाऊन सल्ला घेण्यात आला असून, त्याबाबत त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

In the above matter I have gone through Arbitration application no 142/ 2010 preferred in High Court. I have seen order dt. 24/01/2011 passed by Hon. High Court. It seems that in our absencry the order is passed. I have gone through the notice which is received by us on 20/01/2011. It seems that the notice is very short and no opportunity to appear in the matter.

Considering the suituation it is better that we should face the Arbitration inquiry.

उपरोक्त प्रमाणे एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचे अभिप्रायानुसार सदरहू प्रकरणात संस्थानचे वतीने मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये आब्रिट्रेशनचे कामकाजात सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई यांचे सल्ल्याने पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १८६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. उपरोक्त कायदेशीर कारवाई करणेकामी सचिन शानबाग व अमृत वेर्नेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbitration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली."

सदरहू लवादाबाबत संस्थानचे वतीने सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई हे कायदेविषक काम पहात आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी Presiding Arbitrator म्हणून मुंबई व अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश, F. I. Rebello व संस्थानचे वतीने Arbitrator म्हणून Dr. K. E. Mahashabde यांची नेमणूक केलेली असून, Presiding Arbitrator यांनी प्रस्तुत लवादाच्या एकुण २६ बैठका झाल्या आहेत.

सदरच्या बैठकामध्ये संस्थानचे वतीने द्यावयाचे Cross Examination पूर्ण झालेले आहे. प्रस्तुत प्रकरणी नेमलेले Presiding Arbitrator व Co- Arbitrator यांना त्यांनी निश्चित केलेले फी नुसार त्यांना आजपावेतो रुपये २५,३२,५००/- मात्र इतकी फी अदा करणेत आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने कायदेविषयक काम पहात असलेले सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांनी खालील प्रमाणे कामकाज केले असून, करीत आहे.

1. मा.मुंबई उच्च न्यायलय, मुंबई येथे प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणीसाठी उपस्थित राहणे.
2. Presiding Arbitrator व Co- Arbitrator नेमणूकीसाठी वेळोवेळी न्यायालयात हजर राहणे व त्याच्या होणारे सुनावणीस अपील करणे.
3. Arbitration सुरु झालेनंतर त्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रांची पुर्तता करणे.
4. संस्थानचे वतीने Arbitration मध्ये सादर करावयाचा काउंटर क्लेम तयार करणे, उचित असे लिखीत स्टेटमेंट तयार करणे, व सर्व कागदपत्रांचे संग्रहन करणे (०६ पुस्तके तयार करणे) इ. कामे करणे.
5. Affidavit तयार करुन फाईल सादर करणे.
6. Arbitration hearings साठी उपस्थित राहणे.

उपरोक्त प्रमाणे संस्थानचे वतीने सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई हे काम पहात असून, त्यांना अदा करणेत आलेल्या व शिल्लक असलेल्या फी चा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | दर | रक्कम रु. | अदा केलेली फी | शिल्लक असलेली फी रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Holding conference with senior Ad. A. M. Vernekar SSST and other officals, reading the papers, drafting the notice of motion and affidavit in support. | 50,000.00 | 50,000.00 | 50,000.00 | 0.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Appearances of senior Ad. A. M. Vernekar along with me before his lordship Hon'ble Justice D. K. Deshmukh in the matter on 10/03/2011, 11/03/2011, 18/03/2011 & 31/03/2011 | 100,000.00 | 100,000.00 | 100,000.00 | 0.00 |
| 3 | Dictating & Preparing fair of the Written Statement and Counter –Claim both dated 24/05/2012 & Compilation of documents in all 6 Volumes from 14th May to 24rd May @ Rs 40,000/- Per Day .Therefore 10 days | 40,000.00 | 400,000.00 | 100,000.00 | 300,000.00 |
| 4 | Payment for appearance in Arbitration Petition No. 58 of 2011 | 60,000.00 | 60,000.00 | 60,000.00 | 0.00 |
| 5 | Holding various Conferences with you and Mr.Dinkar Desai- Sectional Engineer & Mr.Gavane– Engineer of Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) including reading charges of various files pertaining to the matter. (from the date of inception till date) (@ of Rs.5000/- per meetings) Total 23 Meeting | 5,000.00 | 115,000.00 | 0.00 | 115,000.00 |
| 6 | Studying the Claimants Applications dated 21/8/2012 pertaining to the objection to the Jurisdiction of Arbitral Tribunal to entertain the Respondents Counter-Claims & drafting and filing reply of the Respondents dated 24/7/2012 including research on the subject. | 40,000.00 | 40,000.00 | 0.00 | 40,000.00 |
| 7 | Preparation, Filing and Service of Affidavit of Evidence in lieu of Examination Chief of Shree Dinkar Manohar Desai of the Respondents dated 15/10/2012– Total 63 Pages (Days consumed – 6 days @ 40,000/- per day) including working on holiday (Sunday) i.e. 13/10/2012 | 40,000.00 | 240,000.00 | 0.00 | 240,000.00 |
| 8 | Attending the Arbitration hearings : In the said matter as directed by the Arbitrational Tribunal Respondent has deposited their tribunal fees in time, however the Claimant thereafter have filed application for reduction of fees which was considered by the Arbitral Tribunal order passed to that effect as follows:- 23 hearings @ 50,000/- per hearing 3 hars.) | 50,000.00 | 1,150,000.00 | 360,000.00 | 790,000.00 |
| 9 | For venue Charges at Kevic Setalvad at 401, Savla Chamber, 4th Floor Cawasji Patel, Fort, Mumbai & Steno typing charges for arbitration tribunal cross examination & Taking dictation of Written Statment and Counter Claim by the Advocate Mr. A. M. Vernekar in the said matter issue by S.R. Computers Typing bill for the following dates | Actual | 123,450.00 | 123,450.00 | 0.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 14/05/2012, 15/05/2012, 16/05/2012, 17/05/2012, 21/05/2012, 22/05/2012, 23/05/2012 and 25/05/2012 pursuant to bill dated 20/06/2012 issued by Mr. Lakshetty Ravindra. & Printing & Stationery and other Miscellaneous Expenses and Towards Typing, Stationery, Photocopying and Spiral Binding of 8 sets (for Both Claimants and Respondents) & Tea and Snacks at Arbitration venue | | | | |
| | | Total Amount | 2,278,450.00 | 793,450.00 | 1,485,000.00 |
| | | | | Less paid Amount Rs. | 600,000.00 |
| | | | | **Balance Amount Rs.** | **885,000.00** |

उपरोक्त तपशिलानुसार सल्लागार, सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांना आजपावेतो रु.१३,९३,४५०/- मात्र फी अदा करणेत आलेली असून, रु.८,८५,०००/- मात्र इतकी फी देणे अद्याप बाकी आहे.

मा.त्रीसदस्य समितीचे दि. १८/१०/२०१३ रोजीचे सभेत सल्लागार संचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांचे प्रलंबीत असलेले फी मागणीबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ८१० खालील प्रमाणे झालेला आहे.

".. मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे लवादाबाबत संस्थानचे वतीने काम पहाणारे अड. सचिन शानबाग आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांचे बरोबर समितीने सदर लवादाबाबत चर्चा केली व त्यांच्या सेवेचे दर कमी करणेबाबत विनंती केली असता, सचिन शानबाग यांनी सेवेचा दर कमी करणेबाबत त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई यांचेशी चर्चा करुन संस्थानला तसे कळविणेत येईल, असे सांगीतले.

उपरोक्त निर्णयानुसार सल्लागार सचिन शानबाग यांनी बिलांमध्ये **Arbitration hearing** साठी रुपये ६०,०००/- ऐवजी रुपये ५०,०००/- मात्र या दराने फी ची मागणी केली आहे. सदरची अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि. २३/०५/२०१४ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. २९९ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई व त्यांचे वकील तसेच संस्थानतर्फे काम पहाणारे वकील सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर यांना एकत्रित योग्यवेळी सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले."

प्रस्तुत प्रकरणांची **Arbitration hearing** ची पुढील तारीख दिनांक १७/०९/२०१४ अशी आहे. याबाबत सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांना पुढील **Arbitration hearing** साठी उपस्थित राहणेबाबत व सदरहू प्रकणाबाबत सविस्तर माहिती तयार करुन संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत इकडील जा. नं.१६६१/२०१४ दि.०८/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. याबाबत सचिन शानबाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दि. २५/०७/२०१४ रोजीचे इ-मेल पत्राव्दारे खालील प्रमाणे कळविले आहे.

".. As stated in the said letter as far as point no.1 I have already conveyed the same to Mr. A.M.Vernekar regarding appearing in the above matter, however pendency of bills is now long pending issue, in the circumstances above it may difficult for me to convince him for appearing in the said matter to conduct further cross examination of the Applicant. Therefore you are hereby once again requested to clear at least pending bill so I can pursue Mr. Vernekar for further process in the said matter.

As far as point no.2, this is to inform you, I have given all details required by you as stated therein along with my bill/s date wise and also reported the date status on time to time and the fact also noted by Sansthan officials who were present at the time of matter.

As far as point no. 3, please inform me in advance for discussion in the present matter on all issues involved. Awaiting for your prompt and speedy reply to expedite the said matter and also for further course of action."

विभागाचा अभिप्रायः तरी सचिन शानबाग, मुंबई यांना सदरहू लवादाबाबत आजपावेतो झालेल्या व पुढील होणारे कार्यवाहीबाबत माहिती देणेसाठी तसेच त्यांचे प्रलंबीत फी बाबत चर्चा करणेसाठी येणार आहे. तरी त्यांचेशी चर्चा करुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवादाबाबत चर्चा करणेसाठी ॲड.शानबाग आजचे सभेत उपस्थित होते, समितीने त्यांचेबरोबर वकील फी व लवाद प्रकरण याबाबत चर्चा झाली. वकील फीचे दर पूर्वी ठरलेले आहेत असे दिसते. परंतु प्रकरणाची अद्याप निर्गती (Decision) झालेली नाही. तेंव्हा श्री.शानबाग यांचेकडे विचारणा करता ८-९ सिटींगमध्ये पूर्ण होईल असे त्यांनी सांगितले. त्यावरुन समितीने असा निर्णय घेतला की, श्री.शानबाग यांना यापुढे जास्तीत जास्त १० सिटींगची फी पूर्वीचे दराने द्यावी, तो पर्यंतही प्रकरणाची निर्गती (Decision) झाली नाही तर फीचे बाबतीत त्यांना वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे.**

**तसेच ॲड.शानबाग यांचेकडून पुढील कालावधीच्या फीचे दराबाबत मागणीपत्रक घेण्यात यावे व सध्या त्यांनी मागणी केलेल्या रु.८,८५,०००/- मात्र वकील फी पैकी ५०% रक्कम रु.४,४२,५००/- मात्र त्यांना आदा करणेत यावी असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६ साईआश्रम भक्तनिवास येथील आर ब्लॉक इमारतीतील उपहारगृहासाठी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देणगीदाखल देऊ केलेले डायनिंग टेबल स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन सदरचा प्रकल्प साईभक्तांकरीता दि.११/०४/२०१३ पासून खुला करणेत आला आहे. साई आश्रम भक्तनिवास येथे वास्तव्यास येणारे साईभक्तांकरीता सध्या आर ब्लॉक इमारतीचे पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये स्वयंसेवी प्रसाद भोजन दि.२१/०७/२०१३ पासून श्री साईप्रसादालय विभागामार्फत सुरु करणेत आलेले आहे. त्यासाठी सध्या श्री साईप्रसादालय किचन येथूनच तयार अन्नपदार्थ आणण्यात येतात. तथापी भविष्यात याठिकाणी असलेल्या किचनमध्येच अन्नपदार्थ तयार करुन भोजन व अल्पोपहार देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी श्री साईप्रसादालय विभागामार्फत किचन कन्सल्टंटचे सल्ल्याने अद्यावत किचन तयार करण्याचे नियोजीत असून त्याबाबत कार्यवाही चालू आहे.

वरील उपहारगृहामध्ये साईभक्तांना बसण्याची अडचण येऊ नये तसेच वयोवृध्द साईभक्तांना खाली बसण्याचा त्रास होऊ नये म्हणून बेंचेसची व्यवस्था करणेबाबत श्री साईप्रसादालय विभागाने दि.१९/०४/२०१४ च्या टिपणी अन्वये इकडील विभागास कळविले होते. साईआश्रम प्रकल्प इमारत बांधकामाचे देणगीदार श्री. के.व्ही.रमणी, कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी साई आश्रम रेस्टॉरंटकरीता डायनिंग टेबल देणगी देण्याबाबत इच्छा व्यक्त केली आहे. त्यानुसार त्यांनी मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे समवेत दुरुध्वनीवरुन झालेल्या चर्चेत मागणी केलेप्रमाणे संस्थानमार्फत दि.२८/०४/२०१४ रोजीचे पत्राव्दारे टेबल तयार करणारे तीन पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेले कोटेशन्स पाठविणेत आले. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी संबंधीत पुरवठाधारक यांचेशी चर्चा करुन त्यांचेमार्फत पुरवठादार मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नाशिक यांना ११० नग एस एस डायनींग टेबलचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पवार इलेक्ट्रो सिस्टमस् प्रा. लि, नाशिक यांनी एस एस डायनिंग टेबलचा नमुना संस्थानकडे पाठविला होता. सदरचे नमुन्याची मा. उपकार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अभियंता, (बांधकाम) यांनी पाहणी करुन आवश्यक त्या सुधारणा करणेबाबत कळविण्यात आले. तरी सदरचे ११० डायनिंग टेबल देणगी दाखल स्विकारणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७ संस्थानचे शिर्डी येथील साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व साईबाबा भक्तनिवासस्थान या ठिकाणी पार्किंग मॅनेजमेंट सिस्टिम उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट– कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय :- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३६५ अन्वये समंत करणेत आलेला आहे.

".. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ व ०२ याबरोबरच संस्थानमधील इतर आवश्यक ठिकाणी पार्किंग मॅनेजमेंट सिस्टिम कार्यान्वीत करणेसाठी सल्लागार म्हणून आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर, मुंबई यांची नेमणूक यांची नेमणूक करणेबाबत कार्यवाही करणेत यावी व यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना :- शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन अलीकडेच सदरहू प्रकल्प साईभक्तांकरीता निवासासाठी खुले करण्यात आलेले आहेत. तसेच साईबाबा संस्थान मार्फत साईबाबा भक्तनिवासस्थान हा प्रकल्प त्यापुर्वीपासून भक्तांचे निवासव्यवस्थेकरीता वापरात आहे. या तिनही ठिकाणी मोठ्या स्वरुपातील पार्किंग व्यवस्था उपलब्ध करणेत आलेली आहे. तथापी याठिकाणी शिस्तबध्द स्वरुपात वाहने पार्किंग करणे, त्यांचे नियोजन करणे, वाहनांची सुरक्षा या बाबी विचारात घेऊन अत्याधुनिक स्वरुपाची पार्किंग मॅनेजमेंट सिस्टीम करणे गरजेचे आहे.

प्रस्ताव :- संस्थानचे साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरातील वाहनतळांसाळी आधुनिक स्वरुपाची पार्किंग मॅनेजमेंट सिस्टीम आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर, मुंबई यांनी संस्थानला देणगीदाखल देऊ केलेली आहे, तसा प्रस्ताव त्यांचे दि.०८/०७/२०१४ रोजीचे इमेलव्दारे प्राप्त झालेला आहे.

तरी वरीलप्रमाणे पार्किंग मॅनेजमेंट सिस्टीम आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर, मुंबई यांचेकडून देणगीदाखल स्विकारणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट अविनाश डहाणूकर, मुंबई यांचेकडून, संस्थानचे शिर्डी येथील साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा व साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरातील वाहनतळांसाठी आधुनिक स्वरुपाची पार्किंग मॅनेजमेंट सिस्टीम देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्वच्छतागृहातील संडास व मुताऱ्यांची संख्या वाढविणेकामी करावयाचे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद ः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचेसभेतील निर्णय ः मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २१ जून, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१ अन्वये, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणेचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणा-या रु.३,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणेचे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणा-या रु. ३,५०,०००/- खर्चास मा. मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २१ जून, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू कामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरचे मुदतीत श्री.बी.पी. शिंदे, पढेगांव यांनी कोरे कोटेशन फॉर्म विकत घेवून सिलबंद निविदा सादर केली असल्याने, सदरहू कामी दिनांक ११ जानेवारी, २०१४ रोजीचे प्रशासकिय मान्यते अन्वये फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१४ ते दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन, दिनांक१७ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिलबंद निविदा सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेऊन सादर केले आहेत.

1. श्री. गोरे अनिल अशोक, नाशिक १९४९७ / १७.०२.२०१४
2. बी. पी. शिंदे, पढेगांव १९४९६ / १७.०२.२०१४
3. निरगुडे आर. व्हि., नाशिक १९४९८ / १७.०२.२०१४

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर सदरच्या तिनही निविदा दि. १०.०४.२०१४ रोजी झालेल्या उपसमितीचे सभेपुढे उघडणेत येऊन, उपस्थित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर |
|---|---|---|
| ०१. | श्री. गोरे अनिल अशोक, नाशिक | ३,९२,०००/- (निविदा रकमेवर १२% अधिक) |
| ०२. | बी. पी. शिंदे, पढेगांव | ३,७४,५००/- (निविदा रकमेवर ७% अधिक) |
| ०३. | निरगुडे आर. व्हि., नाशिक | ३,८५,०००/- (निविदा रकमेवर १०% अधिक) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असलेले स्वच्छतागृहातील संडास व मुता-यांची संख्या वाढविणेचे काम करुन घेणेसाठी मे. बी. पी. शिंदे, पढेगांव हे एकच निविदाधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यामुळे सदरहू विषयावर चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी तीनही निविदाधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेत विषय नंबर ०२ निर्णय क्र. २६४ (०२) अन्वये मान्य करणेत आली.

विभागाचा अभिप्राय/ मतः तरी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा/ वाटाघाटी बंद करणेत आलेल्या असल्याने विषयांकीत काम निम्नतम दराचे ठेकेदार बी. पी. शिंदे, पढेगांव यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रुपये ३,७४,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्वच्छतागृहातील संडास व मुताऱ्यांची संख्या वाढविणेसाठी बांधकाम करणेकामी मे.बी.पी.शिंदे, पढेगाव यांचे रु.३,७४,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, याकामी उपरोक्तप्रमाणे येणाऱ्या रु.३,७४,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईनाथ रुग्णालयातील लिनन व स्टेशनरी विभागातील जनरल टॉयलेट बाथरुम काढून ती जागा रिकामी करुन त्या ठिकाणी नवीन फ्लोरींग बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्ताविकः श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांची संख्या बघता येथे विवीध कार्यालयीन कामाजासाठी तसेच स्टोरेजसाठी जागा अपुरी पडत आहे. रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशव्दारासमोरील जिन्याखाली स्वागतकक्ष आहे. त्याचठिकाणी मागील बाजूस लिनन व स्टेशनरी विभाग सुरु करण्यात आला आहे. तेथे पूर्वीच्या धर्मशाळेच्या वापरातील एकुण १२ टॉयलेट व बाथरुम असून त्याचा वापर सध्या कायमस्वरुपी बंद करण्यात आलेला आहे. तसेच सदर बाथरुम काढल्यास तेथे वार्षीक लिनन व स्टेशनरी ठेवणेसाठी जागा वापरता येईल.

मागणीः वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचेकडील दिनांक १७ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्रान्वये पूर्वीचे धर्मशाळा वापरातील १२ टॉयलेट व बाथरुम काढून त्या ठिकाणी वार्षीक लिनन व स्टेशनरी ठेवणेसाठी जागा रिकामी करुन त्या ठिकाणी नवीन फ्लोरींग बसवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त मागणीनुसार इकडील विभागामार्फत सदरहू भागाची पहाणी करणेत आली असून, सदरचे टॉयलेट व बाथरुमचा वापर बंद असल्याने सदरची जागा वापरात येत नाही. करीता सदरचे भागातील टॉयलेट व बाथरुम चे पार्टीशन वॉल, संडास भांडे, दरवाजे, फरशी इ. काढून त्या ठिकाणी नवीन फ्लोरींग बसवून रंगकाम करुन घेता येईल. याकामी सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.१,६३,४११/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्रायः श्री साईनाथ रुग्णालयातील पूर्वीचे धर्मशाळा वापरात असलेले टॉयलेट बाथरुम कायमस्वरुपी बंद असल्याने, स्वच्छता राहणेचे दृष्टीने तसचे सदरहू जागेचा वापर हॉस्पीटलचे वार्षीक लिनन व स्टेशनरी ठेवणेसाठी १४.७८ मी. X ४.४२ मी. साईजची जागा उपलब्ध होईल. सदरहू टॉयलेट बाथरुम काढून जागा रिकामी करता येईल व सदरचे जागेवर नवीन व्हेट्रीफाईड टाईल्स् फ्लोरींग बसवून लस्टर रंगकाम करुन घेता येईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये १,६३,४११/- खर्चास मान्यता मिळणेस व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील लिनन व स्टेशनरी विभागातील जनरल टॉयलेट बाथरुम काढून त्या ठिकाणी नवीन फ्लोरींग बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,६३,४११/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) चे लगत पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णयः मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४८१.

प्रस्ताविकः संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स्) इमारतीचे पश्चिम बाजूने डांबरी रस्ता करणेत आलेला आहे. सदर रस्त्याचे बाजुने तसेच इमारतीचे सभोवताली असलेल्या मोकळ्या जागेत डांबरीकरण केलेले नसल्याने परिसर साफ सफाई करणेस अडचण येते त्यामुळे परिसर अस्वच्छ राहतो. घुशी, सरपटणारे प्राणी इत्यांदीचा काही वेळा त्रास होतो तसेच तसेच पावसाळ्यांचे दिवसात चिखल होतो. त्यामुळे नेहमीच मुरुम टाकावा लागतो. तसेच खोल्यांमध्ये धुळही येते करीता सदरचा परिसर स्वच्छ राहून सुंदर दिसावा यासाठी सदरहू इमारतीचे लगतचे बाजूने मोकळ्या असलेल्या भागात पेव्हिंग ब्लॉक बसवून घेता येईल.

प्रस्तावः सदरहू इमारतीचे पूर्व व पश्चिम भागात लगतचे बाजूने मोकळ्या असलेल्या भागात ८४० चौ. मिटर एम. २० ग्रेडचे ६० एम. एम. जाडीचे लॅंकर फिनिश पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०१२-२०१३ चे जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, त्यानुसार रुपये ८,९१,३३२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्रायः इमारतीत धुळ येऊ नये परिसरातचिखल होऊ नये तसेच परिसर स्वच्छ राहावा, ड्रेनेज व इतर दुरुस्ती व देखभालीची सोय विचारात घेता श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स्) इमारतीचे पूर्व व पश्चिम बाजूस इमारती लगतचे भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणे योग्य होईल असे मत आहे.

तरी याकामी येणारे रु.८,९१,३३२/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) चे लगत पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,९१,३३२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ द्वारावती भक्तनिवास इमारतीत देणगीदार साईभक्तांची नांवे देण्यासाठी नामफलक (Name Plates) तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद: अधिनियमाचे कलम-२१ मधील पोटकलम (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची

व विश्वस्तव्यस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णयः मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५७४.

प्रस्ताविकः संस्थानचे शिर्डी येथील स. नं. १४८ मधील व्दारावती भक्तनिवास इमारत बांधकाम दिनांक १५/०८/२००९ अखेर पूर्ण करण्यात आलेले असून, सदर इमारतीत तळमजल्यावर पार्किंग व वरील चार मजल्यांवर साईभक्तांसाठी प्रसाधनगृहासह सुसज्ज अशा ३१६ खोल्या साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध आहेत. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५७४ अन्वये देणगीदार साईभक्तांच्या नेमप्लेटस् बांधकाम विभागामार्फत तयार करुन वेळोवेळी पूर्ण होणा-या भक्तनिवास इमारतीच्या खोल्यांना लावण्यात याव्यात, यासाठी येणा-या सर्व आवश्यक खर्चास बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकातून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी सदर इमारतीसह इतर भक्तनिवास इमारत बांधकामांसाठी एकूण २२९५ देणगीदार साईभक्तांचे नावांच्या **5'x7'-6"** आकाराच्या २० नग ग्रेनाईट नेमप्लेटस् व्दारावती भक्तनिवास इमारतीचे मध्यवर्ती जिन्याचे दोन्ही बाजूस बसविणेत आलेल्या आहेत.

आता, लेखाशाखा विभाग यांनी त्यांचेकडील दिनांक १०/०१/२०१४ व दिनांक ०९/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये दि. ३१ मार्च, २०१३ अखेर या योजनेअंतर्गत देणगी देणा-या एकुण ४०७ भक्तांच्या नावांची यादी नेमप्लेटस् तयार करुन बसविणेकामी पाठविलेली आहे.

प्रस्तावः लेखाशाखा विभाग यांनी दिनांक १०/०१/२०१४ व दिनांक ०९/०५/२०१४ रोजीचे पत्रासोबत पाठविलेल्या एकुण ४०७ साईभक्तांच्या नावांच्या नेमप्लेटस् तयार करणेसाठी **5'x7'-6"** आकाराच्या चार नेमप्लेटस् तयार करुन मध्यवर्ती जिन्याचे बाजूस बसवून घेता येतील. त्यासाठी अंदाजे रुपये १,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे काम रुपये १ लक्ष मात्र रकमेचे असल्याने, सदरहू कामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागवून करुन घेता येईल.

विभागाचा अभिप्रायः तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रुपये १,००,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे कामासाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीत देणगीदार साईभक्तांची नांवे देण्यासाठी नामफलक (Name Plates) तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा हॉस्पिटल जनसंपर्क कार्यालयासमोर अवेनिंग शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट– कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना:- संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल मधील जनसंपर्क कार्यालयासमोर दोन खिडक्यांचे काऊंटर आहे. याठिकाणी राजीव गांधी योजना व इतर सुविधांकरीता कागदपत्रांची पुर्तता करणेकामी रुग्णांचे नातेवाईकांची सतत गर्दी असते. रुग्णांचे नातेवाईकांना ऊन व पावसापासून संरक्षण होणेकरीता अवेनिंग शेड उभारणे कामी मा. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दि.२८/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्तावः- सदर ठिकाणी इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष पहाणी करुन, मोजमापे घेण्यात आली आहे. याठिकाणी अवेनिंग शेड उभारणेकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Size | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Providing and fixing of Retractable awning with double sided PVC coated Spanish strip fabric, Fabricated fitted with all accessories and fitting installed at site (fully powder coated) including fastening with alluminium arms, front | 8' X 30' | 240.00 Sq.ft. | 325/- | 78,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | channel gear box system, M.S. bracket etc. complete | | | | |
| | Total Amount :- | | | | 78,000/-. |

याकामी उपरोक्त तपशिलाप्रमाणे रु.७८,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे रक्कम रु.७८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व सदरहू काम वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागवून, करुन घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या जनसंपर्क कार्यालयासमोर अवेनिंग शेड तयार करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा समाधी मंदिरामध्ये वाढीव रेलींग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट– कलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणेचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा समाधी मंदिरात समाधीचे समोरील मोकळ्या भागातून दर्शन घेऊन मुख्य दरवाजा (नंदि व्दार) मार्गे बाहेर पडणा-या महिला व पुरुष भक्तांसाठी स्वतंत्र रेलींग करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा झाली होती. त्यानुसार मंदिर विभाग प्रमुख, संरक्षण विभाग सुपरवायझर श्री. पाटणी व विद्युत विभाग वेल्डर यांचेसमवेत समाधी मंदिरात पहाणी करुन मोजमापे घेण्यात आली. त्यानुसार नियोजित रेलींगचा नकाशा इकडील विभागामार्फत तयार केला असून तो सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

आरत्यांचे वेळी समाधीसमोरील मोकळ्या जागेत गायक, वादक, पुजारी, भालदार, चोपदार असे आठ ते दहा कर्मचारी उभे असतात. त्यामुळे सदरील भागात नव्याने करण्यात येणारे रेलींग स्लायडींग स्वरुपाचे करावे लागेल. म्हणजे आरतीचे वेळी ते सरकविता येईल. तसेच मूळ बुटी वाडा इमारत ज्या ठिकाणी संपते तेथे गोल दगडी खांब आहेत. त्यामुळे तेथे वक्राकार रेलींग करावे लागेल. तेथे रेलींगचे मध्यभागी फक्त तिन फुट जागा उरेल.

तरी समाधी मंदिर सभामंडपात सोबतचे नकाशात दर्शविलेप्रमाणे समाधी चौथ-यासमोरील सुवर्णलेपीत खांबांचे पुर्वेकडील बाजूपासून नंदि व्दारपर्यंत दुतर्फा दोन नवीन रेलींग बसविणेबाबत निर्णयार्थ सादर. उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४ श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना:- श्री साईबाबा हॉस्पीटल येथे स्थानिक रुग्ण, बाह्य रुग्ण तसेच काही रुग्णंना व साईभक्तांना तातडीची सेवा पुरविण्यासाठी १४ डॉक्टर्स ओ. पी. डी. कार्यरत असतात. रुग्णांसाठी पॅसेज व हॉलमध्ये प्रतिक्षालय आहेत. सदरहू ठिकाणी रुग्णांची व कर्मचा-यांची चोवीस तास मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. सततच्या वापरामुळे रुग्णालयातील सर्वच ठिकाणचा आतिल रंग खराब झालेला आहे. तसेच काही ठिकाणी गळतीमुळे देखील रंग खराब झालेला आहे. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीचे आतिल भागास रंगकाम करणे आवश्यक आहे. वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी त्यांचेकडील दिनांक २३/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये रुग्णालयाचे आतिल भागास रंगकाम करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा हॉस्पीटल मधील विविध विभागांचे रंगकाम वेळोवेळीचे मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार हाती घेवून करणेत येत असते. करीता सदरचे रुग्णालयाचे सर्वच इमारतीचे आतिल

भागाचे रंगकाम करणे आवश्यक असल्याने, सदरहू कामी इकडील विभागामार्फत सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसूचीनुसार (**DSR)** तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.९,८३,५६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा हॉस्पीटलचे आतिल भागाचे रंगकाम ब-याच ठिकाणी खराब झालेले असल्याने, रुग्णालय स्वच्छ व सुंदर दिसावे यासाठी सदरहू रंगकाम करुन घेता येईल असे मत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.९,८३,५६०/- खर्चास व सदरचे कामासाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,८३,५६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ श्री साईप्रसादालयाकरिता फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणीकामी फर्निचर तयार करणेचे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतुदः– "अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल:- (घ) भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे."

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०२/२०१४ निर्णय क्र.१५३ (५) अन्वये फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणेकामी फर्निचर तयार करणेकामी मे. सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांचे रु.९,००,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली आहे.

प्रस्तावना:- संस्थानचे श्री साईप्रसादालयाकरिता फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणेकामी ठेकेदार सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांना संस्थानचे जा.क्र.५९७७/२०१४, दि.२२/०३/२०१४ अन्वये सिव्हील व फर्निचरचे काम करणेसाठी कार्यादेश देणेत आला होता. याकामी ठेकेदार यांना सदरचे काम पूर्ण करणेसाठी दि.०६/०७/२०१४ अखेर तीन महिने मुदत देण्यात आलेली होती. ठेकेदार यांनी नियोजित प्रयोगशाळेकरिता करावयाचे फ्लोरिंग व डॅडोचे काम पूर्ण केले असून फर्निचरचे कामास सुरुवात केलेली आहे.

संस्थानचे विद्युत विभागामार्फत प्रयोगशाळेचे विद्युतीकरणाचे स्वतंत्र निविदा मागविणेत येत आहे. विद्युत ठेकेदार यांना प्रयोगशाळेच्या विद्युतीकरणाच्या कामाची रितसर ऑर्डर गेल्यानंतरच प्रयोगशाळेचे वायरींगचे काम पूर्ण करण्यात येईल, असे विद्युत विभागाने दि.०१/०७/२०१४ रोजीच्या पत्राने कळविले आहे.

ठेकेदार यांना काम पूर्ण करण्यासाठी दिलेल्या दि.०६/०७/२०१४ पर्यंतच्या मुदतीत विद्युतीकरणाचे काम पूर्ण न झाल्यामुळे ठेकेदार यांना फर्निचर फॉल्स सिलींग इ. कामे पूर्ण करता आलेली नाहीत. याकरिता ठेकेदार यांनी त्यांचे दि.१४/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये याकामी विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर दोन महिने मुदतवाढ द्यावी अशी विनंती केली आहे.

तरी ठेकेदार सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांना प्रयोगशाळेच्या फर्निचरचे काम पूर्ण करणेसाठी दोन महिन्यांची म्हणजेच दि.०६/०९/२०१४ अखेर मुदतवाढ देणेस मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी विद्युतीकरणाचे काम अपुर्ण असल्यामुळे फर्निचर बनविणारे ठेकेदार मे.सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांना मुदतीमध्ये काम पुर्ण करता आलेले नाही, असे निदर्शनास येते. विद्युतीकरणाचे काम कशामुळे पुर्ण झाले नाही, याची विद्युत विभागाकडे नोटीसीद्वारे विचारणा करणेत यावी व श्री साईप्रसादालयाकरिता फुड टेस्टींग प्रयोगशाळा उभारणीकामी फर्निचर तयार करणेकामीचे ठेकेदार मे.सायली सेल्स कार्पोरेशन, संगमनेर यांना एक महिन्याची मुदतवाढ देणेत यावी व एक महिन्यात काम पुर्ण न केल्यास निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१६** **संस्थानचे अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थानांचे बाधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधील तरतुद-

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे.

प्रस्तावना – शिर्डी मध्ये श्रींचे दर्शनार्थ साई भक्तांची दिवसोंदिवस गर्दीत वाढ होत आहे. त्यामुळे भक्तांना पुरविण्यात येणारे सुविधांमध्ये वाढ होत आहे. भक्तांना अधिक तत्पर सेवा उपलब्ध करण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत शिर्डी व निमगांव को-हाळे हद्दीत अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता निवासस्थानांचे बांधकाम करण्यात आले आहे. त्यामध्ये कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर्स व इतर कर्मचारी यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तथापी अधिकारी व कर्मचा-यांच्या संख्येच्या प्रमाणात सदरची निवासव्यवस्था अपुरी आहे.

तसेच मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली दि. ०२/१२/२०१३ रोजी झालेल्या दोन्हीही रुग्णालयातील डॉक्टरांच्या आढावा सभेच्या इतिवृत्तातील क्र. १० नुसार खालील प्रमाणे कळविणेत आले आहे.

नामांकीत डॉक्टर मिळण्यासाठी त्यांना देण्यात येणा-या सुविधांमध्ये (उदा.Well furnished Quarter) वाढ करावी. डॉक्टरांसाठी नविन निवासस्थाने बांधणेबाबत प्रस्ताव तयार करुन त्वरित सादर करावा.

संस्थानचे बरेच अधिकारी व कर्मचारी यांना १६-२० कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरुन शिर्डी येथे कामावर यावे लागते. येण्या जाण्याचे दृष्टीने ते अडचणीचे होते. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांना शिर्डी जवळ निवासव्यवस्था उपलब्ध करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव- संस्थानचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचेकरीता संस्थानमार्फत निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तथापी सदर अधिकारी व कर्मचारी यांचे संख्येच्या प्रमाणात सदरचे निवासव्यवस्था अपुरी पडत आहे. याकरीता नव्याने जवळ पास ४३० इतक्या सदनिका बांधणे आवश्यक आहे. यात खालील प्रकारे सदनिका बांधता येतील.

| **अ.नं.** | **कर्मचारी हुद्दा** | **फ्लॅटचा प्रकार** | **सदनिका संख्या** | **एका फ्लॅटचे क्षेत्रफळ** |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी, अधिक्षक, अभियंता, सहा शिक्षक, अधिसेविका, पर्यवेक्षक इ. | २ बीएचके | १५० | १५०० |
| ०२ | वर्ग ३ कर्मचारी | १ बीएचके | १२० | ८५० |
| ०३ | वर्ग ४ कर्मचारी | १ बीएचके | १६० | ५५० |

उपरोक्त सदनिकांचे बांधकाम संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. २२१ मधील ३ हेक्टर २६ आर जागेत करता येईल. यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.न. | तपशिल | रक्कम रु.(कोटी) |
|---|---|---|
| ०१. | मुख्य इमारत बांधकाम<br>४,१५,००० चौ.फुट १,५०० रु.प्रती चौ.फुट | ६२.२५ कोटी |
| ०२. | परिसर विकास व कंम्पाऊड भिंत (२०%) | १२.४४ कोटी |
| | **एकुण** | **७४.६९ कोटी** |

प्रादेशिक विकास योजना (शिर्डी विकास केंद्र) नकाशामध्ये मौजे निमगाव को-हाळे गट नं. २२१ मधील जागा हरीत पट्टयात दर्शविली आहे. सदरहु जागा हरीत पट्टयातुन वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठीचा प्रस्ताव शासन स्थरावर विचाराधीन असून, त्याबाबत अद्याप अंतिम अधिसुचना काढण्यात आलेली नाही. सदरहु जागेचा रहिवास विभागात समावेश झालेनंतर वरील प्रकल्पाचे बांधकामासाठी परवानगी मिळू शकेल.

उपरोक्त कामी रहिवास इमारती बनविणे कामाचा अनुभव असणा-या नामांकीत आर्किटेक्ट संस्थानकडून आर्किटेक्टचरल प्लनिंग व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी सव्हीसेस बद्दल सेवा घेणेसाठी Request for Proposal (RFP) मागवून त्यांचेपैकी एकाची निवड करता येईल. त्यांचे नियुक्ती नंतर या प्रकल्पासाठी विस्तृत अंदाजपत्रक व नकाशे बनवून याकामी येणारे खर्चास मान्यतेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे प्रस्ताव सादर करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) यांचे मालकीचे साई वृदांवनम क्षेत्र १३ एकर ८ गुंठे संस्थानला दान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम२००४ मधील तरतुद- अधिनियमाचे कलम १७ (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील

पोट कलम (२) चा खंड (झ) अन्वये "सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील."

पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्ठे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

पोट कलम (२) चा खंड (ठ) अन्वये "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य व ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

प्रस्ताव- श्री नारायण स्वामी, चेअरमन तथा फाऊंडर विश्वशांती साईसेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रपदेश) यांनी त्यांचे ट्रस्टची 'साईवृंदावन' येथील क्षेत्र १३ एकर ८ गुंठे जागेसह श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठी दान स्वरुपात सर्व हक्कासह विनामोबदला देऊ केली आहे. सदरहु जागेस भेट देऊन पुढील कार्यवाही संस्थान मार्फत करणेबाबत दि. २०/७/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

विश्वशांती साईसेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट यांनी देऊ केलेले क्षेत्र मोठे आहे. तरी त्यांचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, विश्वशांती साई सेवा आणि प्रचार समाज चॅरिटेबल ट्रस्ट, देशमुखी, जिल्हा नलगोंडा (आंध्रप्रदेश) यांनी संस्थानला देणगीदाखल देऊ केलेल्या जागेची समिती सदस्य किंवा प्रतिनिधी समक्ष पहाणी करुन निर्णय घेतील, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८ श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१२ मधील क्षेत्र ३.५० एकर (अंदाजे) जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेला प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, रा.शिर्डी यांनी त्यांचेमालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१२ मधील क्षेत्र ३.५० एकर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे.

नविन विकास आराखडयानुसार स.नं.२०७,२०८ व २१५ पैकी २.५९ हे.क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे करीता आरक्षीत आहे.

वरील प्रमाणे आरक्षीत झालेल्या क्षेत्रामध्ये श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, रा.शिर्डी यांचे मालकीचे गट नं.२१२ मधील क्षेत्र ३.५० एकर (अंदाजे) ते श्री साईबाबा संस्थानला सरकारी नियमाप्रमाणे विकत देण्यास तयार आहेत.

(ब) नविन विकास आराखडयाची माहिती देणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील दि.२३ मे,२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र.न.प./टे.क्र.-८/१९०७/२०१४ दि.१६ जून,२०१४ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे माहिती कळविलेली आहे.

"शिर्डी नगरपंचायतीची हद्दवाढ सन २००१मध्ये करण्यात आलेली असून वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडा शासनाचे मंजूरीसाठी मा.उपसंचालक नगररचना, नाशिक यांचेमार्फत सादर करण्यात आलेला आहे. सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेनुसार स.नं.२१२ व स.नं.२१३ चे क्षेत्रामध्ये दक्षिण-उत्तर १५ मी.रस्ता दर्शविण्यता आला असून सदर रस्त्याच्या पुर्वेकडील क्षेत्र हे श्री साईबाबा संस्थानकरीता शैक्षणीक हेतु करीता आरक्षीत असून त्याची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान दर्शविण्यात आलेली आहे.

वाढीव हद्दीची अंतीम विकास योजना शासनाकडून मंजूर झाल्यानंतर व शासनाकडून मंजूर नकाशा प्राप्त झाल्यानंतर आपणास त्याप्रमाणे कळविण्यात येईल."

यावरुन असे निदर्शनास येते की, वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडा शासनाचे मंजूरीसाठी सादर केलेला आहे. अद्याप शासनाची मंजूरी मिळालेली नाही.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.

१. श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, रा.शिर्डी यांनी त्यांचेमालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २१२ मधील क्षेत्र ३.५० एकर जमीन विकत घेणे अथवा न घेणे.

२. जमीन घेणेचा निर्णय झाला तर श्री.शेळके यांना समक्ष चर्चेसाठी बोलावून योग्य ती किंमत ठरविणे.

३. जमीन घेणेचा निर्णय झाला तर संस्थानच्या वकीलांकडून सर्च रिपोर्ट घेणे व अभिप्राय घेणे तसेच खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे. या सर्व खर्चास व इतर तदनुषंगीक स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी इत्यादी बाबीबाबत होणा-या खर्चास मान्यता देणे.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतीम किंमत बाजार भावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/ परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१९** **श्री.पंडीत नानासाहेब शेळके व श्रीमती नलिनी संपतराव शेळके, श्री.मिलींद संपतराव शेळके, श्री.राहूल संपतराव शेळके यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २०३/१, २०३/२ मधील क्षेत्र १ हे. २० आर जमीन विकत घ्यावी म्हणून दिलेला प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** (अ) श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके व श्रीमती नलिनी संपतराव शेळके, श्री. मिलींद संपतराव शेळके, श्री.राहुल संपतराव शेळके यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २०३/१, २०३/२ मधील क्षेत्र १ हे. २० आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे.

गट नंबर २०३/१ चे ७/१२ प्रमाणे स्थिती खालील प्रमाणे

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी नाव | इतर हक्क |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०३/१ | २.५३.०० (पोटखराबासह)<br>जमीन मालकाचे नावाखाली क्षेत्र ५.०६ हे. दर्शविलेले आहे. येथे क्षेत्रात तफावत दिसत आहे. | नलिनी संपतराव शेळके<br>मिलींद संपतराव शेळके<br>राहुल संपतराव शेळके | इतर हक्कात शिर्डी वि.का.स.सो. चे नाव आहे. |

गट नंबर २०३/२ चे ७/१२ प्रमाणे स्थिती खालील प्रमाणे

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी नाव | इतर हक्क |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०३/२ | २.६२.०० | पंडीत नानासाहेब शेळके | इतर हक्कात शिर्डी वि.का.स.सो. चे नाव आहे. |

(ब) भौगोलीक स्थिती-

नविन विकास आराखडयानुसार सर्व्हे नं.२०२ व २०३ पैकी क्षेत्र २.०० हे. संस्थानकरीता आरक्षीत आहे. सदरचे आरक्षीत क्षेत्र आरक्षण क्र. ७ ग.नं.२०३ चे पुर्व बाजूस आहे. नकाशाप्रमाणे चर्तु:सिमा पुर्वेस चारी, उत्तरेस १५ मीटर रुंद नियोजीत डी.पी. रोड व त्या लगत स.नं.२०६, दक्षिणेस स.नं. २०२ पैकी व १५ मीटर रुंद डी.पी.रोड, पश्चिमेस स.नं. २०३ पै.शिल्लक जमीन.

(क) जमीनीच्या किंमतीबाबत-

अर्जदार यांनी सन २०१४ चे रेडीरेकनर तक्त्यानुसार रुपये ७ लाख ९० हजार प्रतीगुंठा किंमतीच्या दुप्पट रक्कम म्हणजेच रुपये १५ लाख ८० हजार किंमत देण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. तथापी याबाबत सब रजिस्टार, राहाता यांचेकडून किंमत ठरवून घेणे उचीत राहील.

(ड) कायदेशीर बाबी-

नविन विकास आराखडयानुसार प्रस्तुत जमीनीवर संस्थानसाठी २ हे. क्षेत्रावर आरक्षण आहे. नविन विकास आराखडा मा. उपसंचालक नगररचना, नाशिक यांचेमार्फत शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यास अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही.

खालील बाबींवर निर्णय होणेस विंनती आहे.

१. श्री. पंडीतराव नानासाहेब शेळके, श्रीमती नलिनी संपतराव शेळके व इतर यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील गट नंबर २०३/१, २०३/२ मधील क्षेत्र १ हे. २० आर जमीन विकत घेणे अथवा न घेणे.

२. प्रस्तुत जमीनीवर संस्थानसाठी २ हे. क्षेत्रावर आरक्षण आहे. अर्जदार यांनी १.२० हे. क्षेत्र विकत द्यावयाचे नमुद केले आहे. उर्वरीत ०.८० हे. क्षेत्राबाबत निर्णय घ्यावा लागेल.

३. श्री. शेळके यांना समक्ष चर्चेसाठी बोलावून योग्य ती किंमत ठरविणे.

४. जमीन घेण्याचा निर्णय झाला तर संस्थानच्या वकीलांकडून सर्च रिपोर्ट घेणे व अभिप्राय घेणे तसेच खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे. या सर्व खर्चास व इतर तदनुषंगीक स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी इत्यादी बाबीबाबत होणा-या खर्चास मान्यता देणे.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमिन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतीम किंमत बाजार भावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/ परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२०** **श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील गट नंबर १४३/५ क्षेत्र १५१.५ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून दिलेला प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील गट नंबर १४३/५ क्षेत्र १५१.५ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे.

गट नंबर १४३/५ चे ७/१२ प्रमाणे स्थिती खालील प्रमाणे

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी नाव | इतर हक्क |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४३/५ | १.५१.५ | बाबासाहेब बाबुराव गोंदकर | नविन शर्तीने कुळ कायदा कलम ४३ प्रमाणे नियंत्रीत सत्ता प्रकार<br>सहकारी सोसायटी इकरार |

(ब) भौगोलीक स्थिती व उपयुक्तता –

गट नं. १४३ च्या लगत पश्चिम बाजुस संस्थानची जमीन गट नंबर १३४ क्षेत्र ८४ आर आहे. प्रस्तुत जमीन संस्थानचे जमीनीस लागुन आहे.

(क) जमीनीच्या किंमतीबाबत -

अर्जदार यांनी प्रस्तुत क्षेत्राची रुपये ३,५०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख पन्नास हजार मात्र) प्रती आर प्रमाणे किंमत अर्जात नमुद केली आहे. त्याप्रमाणे रुपये ५,३०,२५,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी तीस लाख पंचवीस हजार मात्र) किंमत येते. सन २०१४ चे रेडीरेकनर पाहिले असता पान नंबर १३८ वर गट नंबर १४३ नोंदविलेला आहे. त्याच्या पुढे प्रति चौ.मिटर रु.२९८०/- किंमत आहे. त्याप्रमाणे रुपये ४,५१,४७,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी एक्कावन लाख सत्तेचाळीस हजार मात्र) किंमत येते. (बिनशेती झालेली जमीन)

तथापी याबाबत सबरजिस्टार, राहाता यांचेकडून किंमत ठरवून घेणे उचीत राहील.

(ड) कायदेशीर बाबी -

प्रस्तुत जमीन ही कुळ कायदा कलम ४३ नियंत्रीत सत्ता प्रकार असलेली जमीन आहे. तथापी मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्र.कावि/कुक/३९४/२०१२ दि. १८/०५/२०१२ चे पत्रान्वये प्रस्तुत जमीन विक्री करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. सदरहु जमीन श्री. आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांचेकडून श्री. बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी कायदखरेदी घेतलेले आहे. मात्र ७/१२ उता-यावर नविन शर्तिने कुळ कायदा कलम ४३ प्रमाणे नियंत्रित सत्ता प्रकार अशी नोंद आहे.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.

१. श्री. बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील गट नंबर १४३/५ क्षेत्र १५१.५ आर जमीन घेणे अथवा न घेणे.

२. श्री.गोंदकर यांना समक्ष चर्चेसाठी बोलावुन योग्य ती किंमत ठरविणे.

३. श्री.गोंदकर यांचेकडून ७/१२ उता-यावरील इतर हक्कातील नोंदी कमी करुन घेणे. (नविन शर्तीने कुळ कायदा कलम ४३ प्रमाणे नियंत्रीत सत्ता प्रकार. सहकारी सोसायटी इकरार)

४. जमीन घेणेचा निर्णय झाला तर संस्थानच्या वकीलांकडून सर्च रिपोर्ट घेणे व अभिप्राय घेणे तसेच खरेदीखताचा मसुदा तयार करुन घेणे. या सर्व खर्चास व इतर तदनुषंगीक स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी इत्यादी बाबीबाबत होणा-या खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.६३० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमिन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतीम बाजार भावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/ परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२१ साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करण्याचे कामाचा २०१४-१५ साठीचा कार्यादेश साईश्रध्दा लॉन्ड्री ॲण्ड सर्व्हीसेस, प्रोपा.विजय अशोक चव्हाण या नावाने काढणेबाबत मा.व्यवस्थापन समितीपुढे फेर सादर.**

**प्रस्ताव-** साईधर्मशाळा हा विभाग दि.१८/०७/२०१३ पासुन पालखी पदयात्रीतील साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी एकुण सहा इमारती असून पैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलित कनिष्ठ महाविद्यालय यांना वारण्यासाठी दिलेली आहे. उर्वरीत पाच इमारती मध्ये प्रत्येकी ३२ हॉल नूसार एकुण १६० हॉल साईभक्तांचे निवासासाठी वापरण्यात येत आहे.

सन २०१४-२०१५ सालासाठी वर दर्शविलेल्या दराप्रमाणे साईधर्मशाळा येथाल बेडशिट, उशीकव्हर व चादर धुणे/इस्त्री करणेचे वार्षिक काम मिळणेबाबत श्री विजय अशोकराव चव्हाण यांनी दि.३०/१२/२०१३ रोजीचे अर्जाने विनंती केली होती. त्यानुसार दि.१५/०२/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.१६ अन्वये सादर केला होता. त्यावर निर्णय क्र.१६७ नुसार- यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकडील बेडशिट, उशीकव्हर, टॉवेल व चादर धुणे/इस्त्री करण्याचे कामास आहे त्याच मागील वर्षाचे मान्य दरामध्ये एक वर्ष (सन २०१४-२०१५) कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जां.क्र.एसएसएस/ वशी/ साईधर्मशाळा/६०८१/२०१४ दि.२७/०३/२०१४ चे आदेशाने विजय अशोकराव चव्हाण,सावळीविहीर यांना आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

तद्नंतर श्री विजय अशोक चव्हाण यांनी दि.२९/०३/२०१४ चे पत्राने आमच्या फर्मचे नाव साईश्रध्दा लॉन्ड्री & सर्व्हिसेस प्रोप्रा. विजय अशोक चव्हाण या नावाने असुन लेबर लायनन्स, पी.एफ. नं.इत्यादी कागदपत्रे वरील नावाप्रमाणे आहेत. तरी सन २०१४-१५ साठीचा एक वर्षाचा कार्यादेश साईश्रध्दा लॉन्ड्री & सर्व्हिसेस प्रोप्रा. विजय अशोक चव्हाण या नावाने काढण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. सोबत त्यांनी कागदपत्रे जोडलेली आहे.

दिनांक ०१/०४/२०१४ रोजी साईश्रध्दा लॉन्ड्री & सर्व्हिसेस प्रो. विजय अशोक चव्हाण या नावाने कार्यादेश काढणेबाबत टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर वशी-२ यांनी विधीतज्ञ यांचा सल्ला घेवून योग्य ते कागदपत्र पाहूण अभिप्राय दयावे व मग उपरोक्त नावे आदेश पारीत करण्यात यावे असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार विधी विभागास मंजुर टिपणीचे प्रत देण्यात आली होती. त्यावर विधी विभाग यांनी ॲडव्होकेट एस.एम. वाघ कोपरगांव कोर्ट यांना कायदेशीर मार्गदर्शन मिळणेबाबत दिनांक २१/०४/२०१४ रोजी पत्र पाठविले होते. याबाबतीत दिनांक १८/०७/२०१४ रोजी ॲडव्होकेट एस.एम.वाघ यांनी पुर्वीचा कार्यादेश रद्य न करता पुन्हा नव्याने ठराव पारीत करुन साईश्रध्दा लॉन्ड्री & सर्व्हीसेस प्रोपा.विजय अशोक चव्हाण या नावाने कार्यादेश काढण्यास कोणतीही हरकत नाही. असे मार्गदर्शन केलेले आहे.

तरी ॲडव्होकेट एस.एम.वाघ यांचे मार्गदर्शनानुसार दिनांक २७/०३/२०१४ रोजीचा आदेश रद्द न करता पुन्हा नव्याने ठराव करुण साईश्रध्दा लॉन्ड्री & सर्व्हिसेस प्रोप्रा. विजय अशोक चव्हाण, मु.पो. सावळीविहीर खु. जी.आर.बी.वाडी, ता.राहाता, जि.अहमदनगर. या नावाने आदेश काढण्यासाठीचे मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेर सादर.

**निर्णय क्र.६३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲडव्होकेट श्री.एस.एम.वाघ यांचे मार्गदर्शनानुसार साई धर्मशाळा विभागाकडील बेडशीट उशीकव्हर व चादर धुणे/ इस्त्री करणे या कामाचा सन २०१४-१५ साठीचा**

**कार्यादेश साईश्रध्दा लॉन्ड्री ॲण्ड सर्व्हीसेस, प्रोपा.विजय अशोक चव्हाण या नावाने काढणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.२२** **घनकचरा प्रकल्पाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान इमारती व परिसरात दररोज अंदाजे ३ टन घनकचरा निघत असुन दैनंदिन निघणारा घनकचरा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, राहाता नगर परिषद, राहाता आणि शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने राहाता नगर परिषद हद्दीमध्ये तयार करण्यात आलेल्या डेपोवर दि.२९/०७/२०१० पासून नियमीतपणे टाकला जात होता. याठिकाणी साईटेक सायंटिफीक सिस्टीम पुणे यांचे मार्फत घनकच-यावर प्रक्रीया करुन खत तयार केले जात होते. सदर प्रकल्पांवर बगीचा विभागाचे नियंत्रण आहे. तथापी पिंपळवाडी येथील ग्रामस्थांचा घनकचरा टाकण्यास विरोध झाल्याने तेथे दि. २८/०६/२०११ पासून घनकचरा टाकणे बंद करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प माहे मे २०१२ पासून बंद अवस्थेत आहे.

संस्थानचा दैनंदिन निघणारा घनकचरा टाकणेकरिता निर्माण झालेल्या अडचणीमुळे संस्थान मालकीचे निमगाव शिवारातील गट नं.२५० मधे घनकचरा टाकण्यात येत होता त्याठिकाणी बांधकाम विभागाकडे १००x१०० फुट खड्डा घेवून १० फुट उंचीचे वालकंपाऊंड करुन मिळावे अशी मागणी केली. बांधकाम विभागामार्फत गट नं.२४९ मधे १००x१०० फुट खड्डा घेवून १० फुट उंचीचे वालकंपाऊंड करणे बाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१३ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आला त्यावर निर्णय क्र.११ ने सविस्तर चर्चा होवून सदरहू कामास मान्यता देण्यात आली त्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घ्यावी असे ठरले.

देनंदिन घनकच-याची समस्या निर्माण होवू नये म्हणून घनकचरा डेपो व खत प्रकल्प तयार करणेचा बाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/०६/२०१३ रोजीचे सभेपुढे आयत्या वेळचा विषय नं. ०२ ने खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला.

अ) सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने कच-याचे ढीग साचत गेल्यास दुर्गंधी सुटेल. तसे होवू नये म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार गट नं. २४९ मधे १००x१०० फुट खड्डा घेवून १० फुट उंचीचे वालकंपाऊंड करुन तेथे घनकचरा टाकता येईल.

ब) तसेच भविष्यात दैनंदिन घनकच-याची समस्या निर्माण होवू नये म्हणून शिर्डीपासून ठराविक अंतरावर १० ते १५ एकर जागेत कचरा डेपो व खत प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास बांधकाम, बगीचामार्फत सविस्तर प्रस्ताव (जागा, मशिनरी, बांध्काम इत्यादिसह) सादर करता येईल.

उपरोक्त विषयी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ५२४ ने सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमुद केलेल्या अ प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

त्यामुळे प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी मिळणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-आरोग्य/२७१३/२०१३ दि. १४/०९/२०१३ ने उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचेकडे रजि. एडी ने प्रस्ताव सादर करण्यात आला. सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरुन प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांनी त्यांचे दि. ३०/१२/२०१३ रोजीचे पत्राने प्रस्तावात त्रुटी असलेबाबत कळविले होते. पुर्तता करुन फेर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले त्याप्रमाणे पुर्तता करुन जा.नं.एसएसएस/वशी-आरोग्य/५४१७/२०१४ दि. २५/०२/२०१४ ने उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर करणेसाठी दि. २६/०२/२०१४ रोजी या विभागाकडील प्रतिनिधी समक्ष गेले असता उपप्रादेशिक अधिकारी श्री. माने साहेब यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगितले की, प्रदुषण नियंत्रण मंडळ हे घनकचरा साठवणे (Dumping) साठी परवानगी देत नसून घनकच-याची विल्हेवाट लावणेकामी (प्रक्रीया करणेकामी) परवानगी देते. यासाठी संस्थानने स्वतंत्र प्रोजेक्ट तयार करावा व तसा प्रस्ताव सादर करावा प्रस्ताव सादर करणेपुर्वी जागेचे नियोजन करावे.

याबाबत दि. ०५/०३/२०१४ रोजी टिपणी सादर करण्यात आली. त्यावर महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमा प्रमाणे नविन प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

संस्थानचा सध्या दररोज सरासरी ३ ते ४ टन घनकचरा निघत असून भविष्यात त्यात वाढच होत रहाणार आहे. सध्या दैनंदिन निघणारा घनकचरा संस्थानचे मालकीचे स.नं. १८२ या जागेत बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी खड्डे घेवून टाकण्यात येत आहे. त्या अनुषंगाने त्याची विल्हेवाट

लावणे करिता संस्थानने स्वतःचा घनकचरा प्रकल्प उभारणे गरजेचे आहे. प्रकल्प उभारणीसाठी प्रथम १० ते १५ एकर जागेचे नियोजन करावे लागेल.

सदरच्या प्रकल्पासाठी खालील बाबी आवश्यक आहेत.

१. घनकचरा प्रकल्पांसाठी १० ते १५ एकर जागा असणे गरजेचे आहे.

२. घनकचरा प्रकल्पांसाठी असलेल्या जागेबाबत त्या हद्दीतील ग्रामपंचायत कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३. घनकचरा प्रकल्पांसाठी जागा निश्चित झालेनंतर प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घ्यावी लागेल.

४. घनकचरा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी मिळविणे कामी मार्गदर्शन करणे, प्लॅन्टची माहिती देणे, प्रोजेक्टबाबत संस्थानला मार्गदर्शन करणे, प्रोजेक्ट कार्यान्वित करणे आदि कामे त्या क्षेत्रातील अनुभवी कन्सलटंट नेमून करावी लागतील. त्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून पात्र कन्सलटंट नेमावा लागेल.

याबाबत दि. ०३/०७/२०१४ रोजी टिपणी सादर करण्यात आली. त्यावर मा. का. अ. साहेब यांनी उप कार्यकारी अधिकारी यांना सभा घेवून प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केले त्याप्रमाणे दि. २४/०७/२०१४ रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मा. प्र. अ. श्री साबळे साहेब, बगीचा विभाग प्रमुख, शाखा अभियंता, बांधकाम विभाग व प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग यांची सभा घेण्यात आली. सविस्तर चर्चा केल्यानंतर MPCB चे नियमानुसार नविन प्रस्ताव सादर करावा लागेल त्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल असे मा. उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी निर्देशित केले आहे. त्यास अनुसरुन

**अ)** संस्थानने स्वतःचा घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणे, खत निर्मिती करणे, त्यासाठी किमान ०५ ते १० एकर जागा खरेदी करणे किंवा उपलब्ध जागेतून जागा निश्चित करणे.

**ब)** घनकचरा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी मिळविणे कामी मार्गदर्शन करणे, प्लॅन्टची माहिती देणे, प्रोजेक्टबाबत संस्थानला मार्गदर्शन करणे, प्रोजेक्ट कार्यान्वित करणे आदि कामे करणेकामी त्या क्षेत्रातील अनुभवी कन्सलटंट नेमून करावी लागतील. त्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून पात्र कन्सलटंट नेमावा लागेल.

तरी उपरोक्त प्रमाणे अ व ब या दोनही प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६३२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी स्वतंत्र घनकचरा प्रकल्प उभारणीकामी जागा निश्चित करणेत यावी व या प्रकल्पासाठी, वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, पात्र कन्सल्टंटची नेमणूक करणेत येऊन, प्रस्तावीत ब प्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.२३** **श्री रामनवमी उत्सव- २०१४ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१४ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.१६८ अन्वये एकुण रुपये ४७,००,०००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.नं | तपशील | अंदाजपत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप,कमानी व स्टेज | ७९६४७४-०० | ४३५०५८-०० | - | ३६१४१६-०० |
| २ | कलाकार बिदागी बिदागी व निमंत्रित कलाकार कार्यक्रमासह | १७००००-०० | ४९६४२-०० | - | १२०३५८-०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | ५४१८७९-०० | ५१३४७२-०० | - | २८४०७-०० |
| ४ | विदयुत रोषणाई | १००००००-०० | ९०१२८८-०० | - | ९८७१२-०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह | १००००००-०० | ९४१८०३-०० | - | ५८१९७-०० |
| ६ | जादा कर्मचारी | २५००००-०० | २१२५५६-०० | - | ३७४४४-०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | पाणी व्यवस्था<br>टँकर डिझेल व भाडे | ५९०००००-०० | १८४३६६७-०० | | ४०५६३३-०० |
| ८ | कुस्ती हगामा | ३०००००-०० | ६४९६००-०० | ३४९६००-०० | - |
| ९ | इतर खर्च | ५१६४७-०० | १५३९०-०० | - | ३६२५७-०० |
| | एकुण | ४७००००००-०० | ३९०३१७६-०० | ३४९६००-०० | ११४६४२४-०० |

उपरोक्त तपशील पाहता श्री रामनवमी उत्सव २०१४ करीता एकुण ४७,००,०००/- (रु.सत्तेचाळीस लाख) मात्र मंजूर करण्यात आलेली होती. तरतुदीपेक्षा जास्त झालेला एकुण खर्च रक्कम रु.३४९६००/- (रु. तीन लाख एकोनपन्नास हजार सहाशे) मात्र खर्च झालेला आहे. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकूण रुपये ३९,०३,१७६/- (रु.एकोण चाळीस लाख तीन हजार एकशे छहात्तर) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.२४ श्री.चंद्रकांत माणकचंद्र सुराणा, कंत्राटी पध्दतीने ऑफिस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ व मानधनवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद येथे साईभक्तांना सोई व सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयात सामान्य प्रशासन विभागाचे दि.१७/१०/२०१० रोजीचे आदेशाने श्री.चंद्रकात माणकचंद सुराणा यांची ऑफिस असिस्टंट या पदावर दरमहा एकत्रित रु.५,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली होती व त्यानंतर त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देणेत येवून, सामान्य प्रशासन विभागाचे दि.२४/०९/२०१४ रोजीचे आदेशाने दि.२४/०८/२०१३ ते दि.२३/०८/२०१४ अखेर ०१ वर्ष मुदतवाढ देणेत आलेली आहे.

श्री सुराणा यांचे विनंती अर्जानुसार त्यांचे मानधन रकमेत सामान्य प्रशासन विभागाचे दि.१४/०२/२०१२ रोजीचे आदेशाने दि.०१/११/२०११ पासून रु.५०००/- ऐवजी रु.८,०००/- व त्यानंतर दि.३०/११/२०१३ रोजीचे आदेशाने दि.०१/११/२०१३ रोजी पासून रु.८०००/- ऐवजी रु.१०,०००/- प्रतिमहा मानधनवाढ देणेत आलेली आहे. सध्या त्यांना प्रतिमहा एकत्रित रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार मात्र) मानधन देणेत येत आहे.

श्री.सुराणा यांची मुदतवाढ दि.२३/०८/२०१४ रोजी संपत आहे. याकरीता त्यांनी दि.३०/०५/२०१४ रोजीचे अर्जाने "Sir, I have been appointed on temporary basis for one year as a "OffICE ASSISTANT" in our Information Center at Secunderabad, I anr very much interested and happy to work under out esteemed shri Saibaba Sansthan Trust and would like to Continue my service as per your term and condition mentioned in my appointment letter. So I request you sir to consider my application for continuation of service.

Sir, as you aware that day by day rates of bread and butter are increasing high and in these hard days it is very difficult to maintain the family as I am working in Hyderabad city. So I request you to hike my salary for which I and my family will remain ever Grateful to you" असे नमूद केलेले आहे.

सदर अर्जावर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी "श्री चंद्रकांत सुराणा यांना सध्या एकत्रित रु.१०,०००/- मासिक वेतन देण्यात येत परंतु वाढत्या महागाईच्या विचार करता योग्य ती पगारवाढ करावी अशी विनंती त्यांनी केली आहे. तरी त्यांना विनंतीनुसार प्रतिमहा रु.२०००/- पगारवाढ / मुदतवाढ देण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

सन २०१३-२०१४ मध्ये माहिती केंद्र, सिंकदराबाद कार्यालयीन कामकाजासाठी (पगार व इतर) रु.१,९२,९८३/- खर्च झाला आहे व वार्षिक प्राप्ती (पुस्तके, फोटो व इतर साहित्य विक्री, दर्शन, आरती, देणगी व रुम बुकींग) रु.२७,६५,०९१/- संस्थान जमा केली आहे." असा अभिप्राय नोंदविला आहे.

तरी श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफिस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे दि.३०/०५/२०१४ रोजीचे अर्जातील विनंती व प्र.अधिक्षक प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांना लगतच्या

तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ व मानधनवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिकंदराबाद माहिती केंद्र येथून चालत असलेले कामकाज भक्तोपयोगी असून, ऑनलाईन आरक्षणाचा अनेक भक्तांना लाभ होत आहे व प्रकाशनांचे बाबतीत मागील एक वर्षाची आकडेवारी पहाता प्रकाशनांचे विक्रीत वाढ झालेली आहे. त्यामुळे वाढत्या महागाईचा विचार करता श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफिस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे मानधनामध्ये रु.२,०००/- मात्र वाढ करणेत यावी व त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून सलग एक वर्ष कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२५ संस्थान सेवेत असतांना मयत (निधन) झालेल्या वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री.सचिन भाऊसाहेब जाधव यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कै.भाऊसाहेब विनायक जाधव, वर्ग ०४ कर्मचारी, कॅन्टिन विभाग यांचे संस्थान सेवेत असतांना दिनांक ०८ मे २०१४ रोजी रोजी पुणे येथील रुग्णालयात आजाराने दु:खद निधन झालेले आहे. कै. जाधव यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर त्यांचे जागी नोकरी मिळणेबाबत त्यांचा मुलगा श्री सचिन भाऊसाहेब जाधव मु.पो.शिरडी यांनी दि.२१ जून २०१४ रोजी विहीत नमुन्यात अर्ज सादर केलेला आहे. या अर्जासोबत श्री सचिन जाधव यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

०१. कै. भाऊसाहेब विनायक जाधव यांचे मृत्यू प्रमाणपत्र.
०२. श्रीमती कल्पना जाधव (दिवंगत यांच्या पत्नी) व श्री विशाल भाऊसाहेब जाधव (दिवंगत यांचे व्दितीय चिरंजीव) यांनी मा.तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समोर सादर केलेले दि.१६ जून २०१४ रोजीचे संमतीपत्र.
०३. कै.भाऊसाहेब विनायक जाधव यांचे नावे असलेले शिधावाटप पत्रिका क्रं.WG-०३५१७२६.
०४. भारत सरकार आधार कार्ड क्र. ५६५८ ७५५९ ०३९७.
०५. निवडणूक आयोग ओळखपत्र क्र. ITJ - ६१०९०२९.
०६. सदगुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस आणि संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव यांचे शाळा सोडलेचा दाखला क्रं.८२३.(सत्यप्रत)
०७. श्री जाधव यांचे श्री साईबाबा संस्थान आय.टी.आय यांचेकडील Provisional National Trade Certificate. (सत्यप्रत).
०८. श्री जाधव यांचे Higher Secondary Certificate Examination उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका- (सत्यप्रत).
०९. श्री जाधव यांचे Crompton Graves - Apprentice Certificate.
१०. श्री जाधव यांचे TATA - Service Certificate.
११. Directorate of vocational Education and training maharastra Apprenticeship training Scheme Certificate.

दिवंगत कर्मचारी यांची माहीती

| | | | |
|---|---|---|---|
| a. | दिवंगत कर्मचाऱ्यचे पूर्ण नाव | : | भाऊसाहेब विनायक जाधव |
| b. | मृत्युचे वेळी असणारे पदनाम व विभाग | : | वर्ग ०४ कर्मचारी, कॅन्टिन विभाग. |
| c. | वेतनश्रेणी | : | वेतनबँड ४४४०-७४४० + ग्रेड पे १६००+३०० |
| d. | संस्थानमधील कायम सेवेचा कालावधी | : | दि.०६/०३/१९८९ ते दि.०८/०५/२०१४<br>एकूण सेवा २५ वर्षे ०२ महिने ०२ दिवस |
| e. | मृत्यू दिनांक | : | ०८/०५/२०१४. |

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१०००/प्र.क्र. २०/२०००, दि.२८/०३/२००१ तसेच सुधारीत शासन निर्णय क्र. अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४, दि.२२/०८/२००५ अन्वये शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. तसेच अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याच्या वारसाचे वय ४० वर्षाच्या आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते.

या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन ( Form 'F' See Sub - Rule (1) of Rule 6 - " Nomination made herein invalidates my previous nomination." ) फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै. जाधव यांनी हयात असतांना दिनांक २५ जून, १९८९ रोजी ग्रॅच्युएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्री सचिन भाऊसाहेब जाधव (मुलगा) यांची वारसदार (Nominee) म्हणून नेमणूक केलेली आहे. तसेच यापुर्वी शासन निर्णयानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या

विविध निर्णयानुसार, संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत सामावुन घेणेत आलेले आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, श्री सचिन भाऊसाहेब जाधव हे संस्थानमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेस पात्र आहेत, तथापि, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/ ४३३/ (३७/०९)- का.सोळा, दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर असून, सद्य:स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर अंदाजे १२७६ इतके कर्मचारी काम करीत असलेने, सध्या वर्ग ४ चे ३७ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे. तसेच कै. जाधव यांचे कुंटूंबातील कोणताही सदस्य संस्थान सेवेत नाही.

उपरोक्त शासन निर्णय व अन्य बाबी तसेच कै. जाधव यांचे चिरंजीव श्री. सचिन भाऊसाहेब जाधव यांचा लेखी अर्ज विचारात घेता, कै.भाऊसाहेब विनायक जाधव यांचे जागेवर त्यांचे चिरंजीव श्री.सचिन भाऊसाहेब जाधव यांना तूर्त कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत त्यांचे शैक्षणिक विचारात घेता (आय.टी.आय, ईलेक्ट्रीशीयन) विद्यूत विभागाकडे अथवा अन्य विभागाकडे संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग-०४ ची पदे रिक्त नाहीत व ज्या वेळेस वर्ग-०४ ची पदे रिक्त होतील, त्यावेळेस श्री.सचिन भाऊसाहेब जाधव यांना वर्ग-०४ या पदावर त्यांचे वडीलांचे बदली अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत विचार होईल, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२६** **देणगी मिळालेल्या पाच बसेसच्या विम्याबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त, श्री. के. व्ही. रमणी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिरडी साई ट्रस्ट, साईनगर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता आयशर कंपनीच्या नवीन पाच बसेस देणगी दिलेल्या असुन सदर बसेस ताब्यात घेणे पुर्वी विमा उतरविणे आवश्यक होते.

वाहन विभागाकडील मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक क्रं.२८२०, दि.१४/०६/२०१४ रोजीचे टिपणीनुसार, देणगी नवीन पाच बसेसचा वार्षिक विमा उतरविणे कामी राष्ट्रीयकृत कंपन्याकडुन कोटेशन घेवुन निम्नतम दरधारक यांचेकडून विमा उतरविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.२,२५,०००/- (अक्षरी दोन लाख पंचवीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार, राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन कोटेशन बोलाविण्यात आलेली होती. प्राप्त कोटेशन दि.२०/०६/२०१४ रोजी मा. उप कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आली. कोटेशन मध्ये देवु केलेल्या प्रिमियम रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.नं.** | **कोटेशनधारक कंपनीचे नांव** | **कोटेशन मध्ये दिलेली प्रति बस प्रिमियम रक्कम** | **पाच बसेस करीता एकुण प्रिमियम रक्कम** |
|---|---|---|---|
| ०१. | युनायटेड इंडिया इन्शूरेन्स कं. लि. | रु. ४१,१०७.०० | रु. २,०५,५३५.०० |
| ०२. | दि. न्यु इंडिया ॲश्यूरेन्स कं. लि. | **रु. ३६,९११.००** | **रु. १,८४,५५५.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | ओरीएण्टल इन्श्योरेन्स कं. लि. | रु. ३७,०२९.०० | रु. १,८५,१४५.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता, दि. न्यु इंडिया अॅश्यूरेन्स कं. लि. यांचे दर निम्नतम असलेने नवीन ०५ बसेसचा वार्षिक विमा उतरविणे कामी इकडील जा.न.एसएसएस/वाहन/ १४९६/२०१४ दि.२७/०६/२०१४ ने कार्यादेश व सोबत रु.१,८४,५५५/- मात्र रक्कमेचा भारतीय स्टेट बँक-शिर्डी चेक नं.५३७४८१- दि.२८/०६/२०१४ देण्यात आलेला असुन त्यांचेकडुन पाचही बसेसच्या विमा पॉलीसी प्राप्त झालेल्या आहेत.

तरी वरील प्रमाणे देणगी नवीन पाच बसेसचा विमा उतरविणे कामी झालेल्या रु.१,८४,५५५/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चौऱ्याऐंशी हजार पाचशे पंचावन्न) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या पाच बसेसचा विमा उतरविणेकामी झालेल्या रु.१,८४,५५५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **पोलिस उप-निरिक्षक एस.आर.जाधव, संरक्षण अधिकारी यांचेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पोलीस महासंचालक सो. महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश क्र. पोमस/5/5282/ प्रतिनियुक्ती/ शिर्डी संस्थान/1/2009, दिनांक 16/07/2013 अन्वये पोलीस उप निरीक्षक श्री. संपत रेवजी जाधव, नेमणूक वाचक अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर यांची पोलीस अधिक्षक अहमदनगर यांचे नियंत्रणाखाली श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी जि. अहमदनगर येथे 03 वर्षाच्या कालावधीसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रतिनियुक्तीवर संरक्षण अधिकारी या पदावर नेमणूक झालेली आहे.

त्यानुषंगाने पोलीस उपनिरीक्षक श्री. संपत रेवजी जाधव हे संरक्षण अधिकारी म्हणून दिनांक 19/08/2013 रोजी हजर झालेले आहे. त्यांचेवर संरक्षण अधिकारी म्हणून मंदिर, मंदिर परिसर, संस्थान संलग्न परिसर, तसेच साईभक्तांचे सुरक्षिततेची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. तथापि, दिनांक 30/06/2014 रोजी साई उद्यान परिसरात पाकीटमार इसमांनी साईभक्तांचे पाकीट काढत असतांना साईभक्तांनी व सुरक्षा रक्षकांनी सदर इसमास पकडले असता सदर पाकीटमार इसमासमवेत असलेले इतर 10 ते 15 इसमांनी साईभक्तांवर तसेच सुरक्षा रक्षकांवर दगडफेक करण्यात आली. याबाबत संरक्षण अधिकारी यांनी राऊंड घेऊन वेळोवेळी बंदोबस्त ठेवणे आवश्यक होते तसेच त्यांनी तयांचे कर्तव्य जबाबदारीने पार पाडले नाही. त्यामुळे सदर घटनेबाबत विविध वृत्तपत्रात वृत्त छापून आल्याने शिर्डीतील सर्व पक्षीय ग्रामस्थ (40 ते 50 ग्रामस्थ) यांनी संस्थान संरक्षण कार्यालयात येऊन त्यांनी श्री. संपत रेवजी जाधव, पोलीस उपनिरीक्षक यांचे कर्तव्यातील हलगर्जीपणा बाबत व उपरोक्त नमूद घटनेबाबत मोर्चे काढून निषेध व्यक्त केला.

तरी सर्व झालेला प्रकारामुळे श्री. संपत रेवजी जाधव पोलीस उपनिरीक्षक (संरक्षण अधिकारी) यांनी पुढील कालावधीसाठी सक्तीच्या रजेची मागणी केल्याप्रमाणे तयांना सक्तीचे रजेवर सोडण्यात यावे. तसेच त्यांची बदली करुन श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी येथे मंदिर, मंदिर परिसर, संस्थान सलग्न परिसर तसेच साईभक्तांनी सुरक्षितता व शिर्डी हे धार्मिक देवस्थान असल्याने संस्थानचे संरक्षण अधिकारी या पदावर कार्यक्षम अधिकारी नियुक्त करण्यात यावा याबाबत मा. पोलीस महासंचालक सो. महाराष्ट्र राज्य मंबई यांना जा. नं. एसएसएस/वशी-संरक्षण/1594/2014, दिनांक 04/07/2014 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

श्री. संपत रेवजी जाधव पोलीस उपनिरीक्षक यांनी रजेबाबत संस्थानचा छापील रजा/ सुट्टी अर्ज भरणे आवश्यक होते. परंतु, तयांनी तसे न करता साध्या पेपरवर दिनांक 02/07/2014 पासून 30 दिवसाकरिता हक्काची रजा सन 2014- 15 या आर्थिक वर्षात मंजूर होणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. त्यामुळे त्यांना संस्थान नियमाप्रमाणे अर्ज भरणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार दिनांक 19/07/2014 रोजी रजा अर्ज क्र. 01 नुसार दिनांक 04/07/2014 ते दिनांक 31/07/2014 अखेर 28 दिवसांचा हक्काचा रजेचा अर्ज दिलेला आहे. तसेच रजा अर्ज क्र. 02 नुसार दिनांक 04/06/2014 ची राहिलेली आठवडा सुट्टी दिनांक 03/07/2014 रोजी व दिनांक 02/07/2014 रोजीची आठवडा सुट्टी मिळणेबाबत इकडील कार्यालस दोन्ही रजेचे अर्ज दिलेले आहे. सदर रजा अर्ज मान्य करुन पोलीस उपनिरीक्षक श्री. संपत रेवजी जाधव संरक्षण अधिकारी यांचा मागील कामाचा अनुभव पाहता त्यांना दिनांक 01/08/2014 पासून कामावर हजर करु घेता येणार

नाही असे मत आहे. तसेच मंदिर, मंदिर परिसर, मंदिर सलग्न परिसर तसेच साईभक्तांची सुरक्षितता व शिर्डी हे धार्मिक देवस्थान असल्याने संस्थानचे संरक्षण अधिकारी या पदावर पोलीस उपनिरीक्षक या ऐवजी पोलीस निरीक्षक दर्जाचा सक्षम पोलिस अधिकारी संस्थानमध्ये संरक्षण अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यासाठी मा पोलिस महासंचालक साहेब ,महाराष्ट्र राज्य मुंबई यांना पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे मार्फत पत्र देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे प्रतिनियुक्तीने नेमलेले पोलिस उप-निरिक्षक श्री.संपत रेवजी जाधव, संरक्षण अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा कर्तव्यातील हलगर्जीपणा पाहता, त्यांना संस्थानकडून दि.०१.०८.२०१४ चे माध्यान्हपुर्व पासून कार्यमुक्त करणेत यावे.**

**श्री.संपत रेवजी जाधव यांनी मागणी केलेल्या प्रस्तावातील नमुद रजा/ सुट्टया मंजूर करणेत येत आहे. तसेच, शिर्डी हे धार्मिक देवस्थान असल्याने व मंदिर, मंदिर परिसर, मंदिर सलग्न परिसर आणि साईभक्तांची सुरक्षितता विचारात घेता संस्थानचे संरक्षण अधिकारी पदावर पोलिस उपनिरीक्षक ऐवजी पोलिस निरिक्षक दर्जाचा सक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीने तातडीने नियुक्त करणेसाठी मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना मा.पोलिस अधीक्षक, अहमदनगर यांचेमार्फत पत्र देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **समाधी मंदिरामध्ये ब्रासचे रेलींग देणगीदाखल देणेबाबत श्री.किशोर प्रितमदास कृष्णानी, उल्हासनगर यांचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे समाधी मंदिरामध्ये असलेल स्टीलचे रेलींग हे विदयुत विभागाचे देखभाल व नियंत्रणाखाली आहेत. गाभा-यातील रिलींग हया स्टीलच्या बविण्यात आलेल्या असून सदर रिलींग विद्युत विभागामार्फत बसवून बराच कालावधी झालेला आहे. त्यामुळे सदर रिलींग नितयाच्या वापराने ब-याचशा रिलींग खराब झालेसारखे वाटतात. त्यामुळे काही कालावधीनंतर सदर रिलींग नवीन टाकणे गरजेचे आहे.

तथापि, दिनांक 10/07/2014 रोजीचे पत्रात साईभक्त श्री. किशोर प्रितमदास कृष्णाजी उल्हासनगर यांनी श्री. समाधी मंदिरामध्ये सध्या नंदीचे पुढील भागात दोन्ही बाजूला असलेले स्टीलचे रेलींग ऐवजी ब्रासचे गोल्डन कोटेठ रेलींग ते स्वखर्चाने तयार करुन देणेस तयार आहेत. तसेंच अजून यामध्ये काही रेलींग वाढल्यास तयाही स्वर्चाने करुन देणेस तयार आहेत. यासाठीचा सर्व खर्च ते स्वतः करणार असून याकामी संस्थानचे असलेल्या अटीशर्ती त्यांना मान्य आहेत तरी याकामी परवानगी मिळावी असे त्यांनी कळविले आहे.

त्यानुसार श्रींचे गाभा-यातील खांबाना तसेच भितींना सोन्याचे कोटेठ करण्यात आलेले आहे. साईभक्त श्री. किशोर प्रितमदास कृष्णाजी उल्हासनगर यांचेकडून गोल्डन कोटेड रिलींग देणगी स्वरुपात स्विकारुन विद्युत विभागामार्फत श्रींचे गाभा-यात रिलींग बसविल्यास गोल्डन कोटेड रिलींगमुळे श्रींचे संपूर्ण गाभारा अतिशय सुभोभित दिसेल.

तरी श्री समाधी मंदिरामध्ये (श्रींचे समाधी समोरील रिलींग) नंदीपुढील दोन्ही बाजूच्या रिलींग विद्युत विभागामार्फत काढून तेथे ब्रासचे गोल्डन कोटेड रिलींग देणगीदार साईभक्त श्री. किशोर प्रितमदास कृष्णाजी उल्हासनगर यांचेकडून स्विकारणेस तसेच यामध्ये काही रिलींग वाढल्यास त्याही रिलींग स्विकारणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **साईआश्रम- ०१ भक्तनिवासस्थान विभागासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम-१ भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये सर्वसमाविष्ठ कॅमे-यांचा सर्वे करण्यत आला असुन त्यानुसार प्राथमिक स्वरुपात रु. ४ ते ५ कोटी खर्च अपेक्षित आहे. परंतु सध्याचे आवश्यकतेनुसार, सीसीटीव्ही यंत्रणा बसविता येईल. त्यानुसार संबंधीत ठिकाणी पहाणी करुन व संबंधीतांशी चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार खालीलठिकाणी कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मेनगेट – पुर्वबाजु | - ३ नग |
| २) | मेनगेट – पश्चिमबाजु | - ४ नग |
| ३) | वेटींग हाल | - ६ नग |

| | | |
|---|---|---|
| ४) | काऊंटर बाहेरील बाजु | - ३ नग |
| ५) | काऊंटर आतील बाजु | - २ नग |
| ६) | मुख्य प्रवेशद्वार | - १ नग |
| ७) | भोजन तिकीट काऊंटर | - १ नग |
| ८) | भोजन हॉल | - ५ नग |
| ९) | प्रवेशद्वार | - १ नग |
| १०) | Exit Gate | - १ नग |
| ११) | गार्डन | - १ नग |
| १२) | मेनगेट (बाहेरील बाजु) | - १ नग |
| १३) | R ब्लॉक उत्तर व दक्षिणबाजु | - २ नग |

सध्याची तातडीची आवश्यकतेनुसार ३१ कॅमे-यांची आवश्यकता आहे. त्याचा बॅकअप हा ३ दिवसासाठी उपलब्ध राहील. यासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. no | Specification | Brand | Qty. |
|---|---|---|---|
| 01 | Outdoor IP IR Camera<br>- Sony Super HAD II<br>- 8 mm HD Lens<br>- 2 Mega Pixel camera<br>- distance - 30M<br>-network support<br>-TCP/IP.HHTP,DHCP<br>-3 years onsite comprehensive warranty | SONY | 31 |
| 02 | 36 CH NVR/DVR<br>- 36 IP camera input,1BNC,HDMI<br>- Display split -1,8,16,14<br>- 4TB SATA HDD.<br>- DVD writer<br>- USB port,<br>- Network support | - | 01 |
| 03 | 3 KVA UPS.<br>3 Years onsite warranty | APC | 01 |
| 04 | 32 Inch. LED TV<br>3 Years onsite comprehensive warranty | LG | 01 |
| 05 | All necessary conduit/PVC<br>Cat-6 cabling for data & power for said project | - | As requirement |
| 06 | Installation & labour charges | - | One time |
| 07 | Tech support of one technician | - | 3 year (warranty period) |

वरील सदरच्या कामासाठी एकंदरीत ४.९० लाख + टॅक्स खर्च अपेक्षित आहे व तीन टेक्नीशियनसाठी दरमहा ३० हजार + टॅक्स हा वॉरंटी कालावधीत (प्रकल्प पुर्ण झालेवर, पुढील ३६ महिन्यासाठी) खर्च करावा लागेल. सदर प्रकल्पाची वर्कऑर्डर दिल्यानंतर, प्रकल्प ७५ दिवसात पुर्ण करता येईल.

उपरोक्तप्रमाणे, साईआश्रम- १ भक्तनिवासस्थान परिसरात ३१ कॅमेरे बसविण्यासाठी एकत्रित ४.९० लाख + टॅक्स व तीन टेक्नीशियनसाठी येणा-या मासिक खर्चाच्या मान्यतेसाठी मा. त्रिसदसय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल प्रमुख)

---

**विषय नं.३० समाधी मंदिरातील दैनंदिन सफाई आऊटसोर्समार्फत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दैनंदिन श्रींचे समाधी मंदिरामध्ये साईभक्त दर्शनासाठी येतात. दर्शनाकरिता येतांना साईभक्त आपले समवेत हार, फुले, प्रसाद, इ. साहित्य आणतात. दर्शन रांगेतून येतांना साईभक्तांकडुन हारांची फुले, पाण्याच्या बाटल्या, पाणी, प्रसाद जमिनीवर पडतो. त्यामुळे समाधी मंदिरामध्ये कचरा होतो.

समाधी मंदिरामध्ये मंदिर विभागामार्फत साधारणत: दर २-३ तासांनी समाधी मंदिराचे गाभाऱ्यात सफाई करण्यात येते. त्यानुसार काकड आरती व मंगलस्नान झाल्यानंतर तसेच माध्यान्ह आरती, धूपारती

व शेजारतीचे अगोदर समाधी मंदिरातील साफ-सफाई करण्यात येते. त्यामध्ये मंदिरातील फरशी डिटर्जंट पावडर, पाण्याने साफ करण्यात येते. तसेच वेळोवेळी गर्दी कमी झाल्यानंतर मंदिरातील चोपदारही झाडूने कचरा साफ करण्याचे काम करत असतात. परंतु, मंदिर विभागाकडे तात्काळ सफाईकरिता पूर्णवेळ वेगळे कर्मचारी नाहीत. त्यामुळे समाधी मंदिरातील सफाई आऊटसोर्समार्फत १२ कर्मचारी नेमून करणे गरजेचे आहे. या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा पहाटे ४ ते १२, ११ ते १९ व १७ ते २३.३० अशा रहातील व प्रती शिफ्टला ४ कर्मचारी असतील.

तरी उपरोक्तप्रमाणे साफसफाईकामी स्वतंत्र १२ कर्मचारी आऊटसोर्सिंग मार्फत लावणेस मंजुरी मिळणेस विनंती आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.६४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिरामध्ये दैनंदिन साफसफाईकामी आवश्यक असणारे प्रतिदिनी १२ कंत्राटी कर्मचारी सध्याचे श्री साईप्रसादालय विभागाकडील हाऊस किपींग कॉन्ट्रॅक्टर मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कॉन्ट्रॅक्टरमार्फत आऊट सोर्स पध्दतीने दि.०१.०९.२०१४ पासुन घेण्यात यावे.**

**सदर कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन + प्रा.फंड १३.६१ % (मालकचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेस सह + सर्व्हीस टॅक्स १२.३६ % + कॉन्ट्रॅक्टर बरोबर झालेल्या करारातील अटी व शर्ती प्रमाणे व मा.उच्च न्यायालयाचे संबंधीत विषयावरील निर्णयास अधीन राहून सानुग्रह अनुदान ८.३३ % (दिपावली सणा निमित्त) याप्रमाणे रक्कम संबंधीत कंत्राटदारास अदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग/ प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग)

---

**विषय नं.३१** **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना संस्थानचे श्री साईआश्रममध्ये केऑस्क मशिनकरीता जागा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ दि पिलग्रिम्स ईन, शिर्डी यांनी महाराष्ट्रातील पर्यटनाचा व पर्यटन स्थळांचा विकास महाराष्ट्रातील धार्मिक क्षेत्र, तीर्थक्षेत्र, पर्यटन स्थळे,गड, किल्ले,जागतिक वारसा असलेल्या वास्तु, महाराष्ट्रातील धार्मिक क्षेत्र,तीर्थक्षेत्र, पर्यटन स्थळे, सेवा, याबाबतची अद्यावत माहिती केओस्क मशिनव्दारे उपलब्ध होते. हे मशिन साईभक्तांच्या सेवेसाठी ठेवणेकामी साईआश्रम भक्तनिवास येथील स्वागत कक्षामध्ये दर्शनी भागात व संस्थानच्या सोईनुसार ४" X ४" फुट या आकाराची जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी संदर्भिय पत्राने केलेली आहे .

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ चे **कलम १७(३)** नुसार विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाकडून लेखी पुर्व मंजूरीने त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहान टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही. थोडक्यात जागा भाड्याने देण्यापूर्वी शासनाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टातील पी.आय.एल. १८/२०११ राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मधील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर १२०५६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. १६/१०/२०१२ रोजी जो आदेश दिला त्यात कलम ६ खालील प्रमाणे आहे.

We direct that, without prior permission of this Court, the Committee.-

(a) Shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.२ - trust;

सदर आदेशान्वये संस्थानमध्ये निहीत असलेली जागा तिऱ्हाईत इसमास देणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

तसेच मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार नविन भक्तनिवासस्थान येथील गाळे व जुन्या प्रसादालय परिसरातील स्टॉल्स् संस्थान वापरासाठी रिकामे करुन ताब्यात घेणेत आलेले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना साईआश्रम १ येथे कियॉस्क मशिनसाठी जागादेणेकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे कियॉक्स मशिनचा साईभक्तांना मिळणाऱ्या सोयींचा विचार करता कियॉक्स साठी लागणारी जागेचे मासिक परवाना फी, मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार ठरवुन प्रस्तुत जागा एक वर्षाचे कालावधीसाठी मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेवून वापरांस देणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३२ गुरुस्थान मंदिराच्या दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम नियमित चालविण्यास परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस गुरुस्थान मंदीराच्या दक्षिणेकडील सिटी सर्व्हे नं. २० नगरपंचायत मिळकत घर नं. ७०६ मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील विषय नं. २ निर्णय क्र. १७२ अन्वये मागील अटी शर्ती प्रमाणे पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (म्हणजे रु. ४,४००/- + ४४० असे एकुण रु. ४,८४०/- मात्र) दि. २०/०१/२०१२ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी व्यवसाय करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सोसायटीस जा.क्र. एसएसएस वशी-विधी/ १०८१/२०१२ दि.११/०६/२०१२ चे आदेशाने दि.२०/०१/२०१२ ते दि.१९/१२/२०१२ या कालावधीसाठी गुरुस्थान मंदीराचे दक्षिणेकडील सर्व्हे नं. २० नगरपंचायत मिळकत घर नं. ७०६ मधील १ खोली देण्यात आली होती. त्याबाबतचा करारनामा दि. ०४/०७/२०१२ रोजी करण्यात आला आहे.

दि. ०४/०७/२०१२ रोजीचे करारातील क्लॉज नं. २ सदरची मुदत (दि. २०/०१/२०१२ ते दि. १९/१२/२०१२) संपताच करारनामा आपोआप संपुष्टात येणार असलेबाबत नमुद केले आहे. त्यानुसार सदरचे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसायाची मुदत दि. १९/१२/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने पुन्हा दि. ११/१०/२०१२ रोजीचे पत्राने पुढील पाच वर्षा करीता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली होती. त्यावर दि. १७/११/२०१२ रोजीचे पत्राने सोसायटीस मा.कोर्टाचे पुर्व परवानगी शिवाय पुढील मुदतवाढ देता येत नसलेबाबत कळविलेले आहे. तथापी सोसायटीने त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. संस्थानची जागा संस्थानकडे परत केली नाही. जागेचा वापर अनाधिकारे चालू ठेवला, सोसायटीकडील संस्थान मिळकतीचा वापर तात्काळ बंद करणेबाबत सोसायटीस पत्र पाठविणेकामी दि. २५/१२/२०१२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर केली होती. त्यावर कराराची मुदत संपली असेल तर त्वरीत ताबा घ्यावा व तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी दिल्यानंतर दि. २६/१२/२०१२ रोजी सोसायटीस दि. १९/१२/२०१२ रोजी मुदत संपुष्टात आलेली असून जागेचा वापर त्वरीत बंद करुन जागा अधिक्षक श्री साईप्रसाद निवासस्थान व संरक्षण विभाग यांचे ताब्यात द्यावी अशा आशयाचे पत्र पाठविले होते. त्याची प्रत साईप्रसाद निवासस्थान व संरक्षण विभाग यांना पाठविण्यात आली होती.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने पुन्हा दि. २६/१२/२०१२ रोजीचे पत्राने मोबाईल कॅमेरा क्लोकरुम साईभक्तांचे साईसाठी व सेवेसाठी चालूठेवणेस विनंती केलेली होती. सदरचे मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचा वापर दि. ०२/०१/२०१३ रोजी सायंकाळपासून संस्थानकडून बंद करण्यात आलेला असल्याचे विशेष कार्य अधिकारी यांनी दि. २९/१२/२०१२ चे टिपणीवर नमुद केले होते. मात्र गाळ्यास श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. ऑप. सोसायटीचेच कुलूप होते. त्यामुळे संस्थान वापरांस मिळकतीचा उपयोग होत नव्हता दि. २५/०१/२०१३ रोजी संस्थान प्रतिनीधी यांचेमार्फत प्रस्तुत मिळकतीस संस्थानचे कुलूप लावण्यात आले. त्यावर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने पुन्हा दि. १२/०१/२०१३ चे पत्राने आता प्रस्तुतचा गाळा पुन:श्च पुर्ववत चालू करणेकामी आदेश होणेस विनंती केली. तसेच सदर क्लोकरुम मध्ये संस्थेचे किंमती डेडस्टॉक सामान असल्याचे कळविले असतांना त्याठिकाणी संस्थान कर्मचाऱ्यांनी संस्थानचे कुलूप लावले आहे. सदरची कारवाई ही बेकायदेशीर असून सदर बेकायदेशीर कृत्याबद्दल संस्थान कर्मचारी (श्री साईप्रसाद निवासस्थान, संरक्षण विभाग व विधी विभाग ) यांना जबाबदार धरण्यात येत असलेबाबत दि. ०१/०२/२०१३ रोजीचे पत्राने कळविले आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. नं. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ मध्ये दि. १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशात पॅरा नं. ६ (अ) मध्ये ः without prior permission of the Court the committee shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent no.२ turst; असा असून त्यात मा.कोर्टाचे पुर्व परवानगीशीवाय कमिटीने संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये, असा आदेश झालेला आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीचे दि. १२/०१/२०१३ व दि. ०१/०२/२०१३ रोजीचे पत्रास अनुसरुन मोबाईल / कॅमेरा क्लोकरुम पुर्ववत चालू करणेबाबतचे विनंतीचा विचार करता येणार

नाही. मंदिराचे दक्षिणेकडील जागा संस्थान वापरासाठी आवश्यक असलेने गाळा / जागा संस्थानला तात्काळ मोकळे / रिकामे करुन देण्यात यावेत असे जा.क्र. एसएसएस वशी विधी/ १९९५/२०१३ दि. २९/०७/२०१३ ने सोसायटीस कळविण्यात आले होते.

साईप्रसाद निवासस्थान विभागाने दि. १८/०२/२०१४ रोजी चे पत्राने गुरुस्थान मंदिराच्या दक्षिणेकडील खोली दि. २५/०१/२०१३ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाच्या ताब्यात होती दि. ३१/१०/२०१३ रोजी सदरील खोलीची चावी बांधकाम विभागास विभागांतर्गत खोलीची मापे घेण्याकरीता देण्यात आली होती. मात्र मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी गुरुस्थान मंदीराच्या दक्षिणेकडील रस्त्यालगत असलेल्या संस्थानच्या जागेची पहाणी केली असता (सी.टी.स.नं. २०) दक्षिणेकडील गेट नं. ४ चे प्रवेशव्दाराजवळ साईभक्तांना मोबाईल ठेवणेसाठी लॉकर उपलब्ध नसल्याने साईभक्तांची निर्माण होणारी अडचण लक्षात घेता त्यांनी पुर्वीप्रमाणेच गुरुस्थान मंदीराच्या दक्षिणेकडील खोलीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी यांचे मार्फत त्वरीत मोबाईल लॉकर सुरु करणेबाबत तोंडी सुचना दिल्या त्यानुसार बांधकाम विभागाने त्यांचेकडे जमा असलेली गुरुस्थान मंदीराच्या दक्षिणेकडील चावी दि. ०७/११/२०१३ पासून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुरु करणेकरीता दिलेली आहे. असे कळविले आहे.

आता दि. ०२/०५/२०१४ रोजीचे पत्राने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि. ०७/११/२०१३ पासून सुरु करण्यात आलेले असून संस्था सदर क्लोकरुमचे दरमहाचे जागा भाडे संस्थानचे लेखाशाखेत नियमीत भरणा करत आहे. तरी संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम नियमीत चालविण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.२८/१०/२०१३ रोजीचे पत्र संस्थानला (संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन पी.आय.एल. नं. २५/२०१२ चे अनुशंगाने) प्राप्त झाले असून सोसायटीचे पेढा विक्री मुद्याचे अनुशंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करणेचे संस्थानला सुचीत केले आहे.**:-**

" मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याने प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात याव्यात.

मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थीक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कारवाई करण्यात यावी. "

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि. ०२/०५/२०१४ चे पत्राने गुरुस्थान मंदिराचे दक्षिनेस चालवत असलेले क्लोकरुम नियमित चालविण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे. परंतू शासनाचे उपरोक्त मोबाईल व चप्पल स्टॉन्ड सुविधाबाबतचे निर्देश लक्षात घेता सदर बाबत प्रकरणी चौकशीसाठी खालील माहिती / बाबी उपलब्ध आहेत अढळ आहेत.

१) मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा भक्तांचे सोयीसाठी सुरु केलेली आहे. त्यामध्ये नफा किंवा आर्थीक फायदा मिळविणेचा संस्थानचा उद्देश नाही. तसेच त्यामुळे आर्थीक फायदा नुकसानी पेक्षा भक्तांचे सुविधांचा विचार करणेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सोसायटीकडून लिव्ह ॲन्ड लायसेन्स फी आकारणेत येत आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी ही सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट कायद्याखाली नोंदलेली संस्थान नोकरांचे संबंधीत सहकारी संस्था आहे त्यामुळे खाजगी व्यक्ती नाही. सोसायटीस Leave and Licence तत्वावर वापरांस परवानगी मागत आहे . त्यामुळे सोसायटी भक्तांना सुविधा जबाबदारीने देऊ शकते त्यामुळे सोसायटीकडून प्रामुख्याने मोबाईल चप्पल स्टॅन्ड काढून न घेता व जाहिर निविदा न काढता प्रतीवर्षी (१०% वाढ करुन ) नुतनीकरण करण्याचा विचार करता येईल .अशी शिफारस वजा अभिप्राय आहे. तरी

**अ)** क्लोकरुम सुविधा पुरविणेबाबत संस्थानचा नफा मिळविणेचा प्रामुख्याने प्रस्तुतचा उपक्रम नाही. तर भक्तांना सुविधा देणेबाबतचा हेतू आहे . करीता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि.०२/०५/२०१४ चे पत्राने गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेस चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसायाची मुदत दि. ०७/११/२०१३ नंतर पुढील एक वर्षासाठी मागील (भु-भाडे ) रक्कम रु. ४,८४०/- मध्ये १० % वाढ करुन रक्कम रु. ५३२४/- दरमहा आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे

आकारुन विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अँन्ड लायसेन्स तत्वावर पुढील एक वर्षा साठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने देणे. **किंवा**

**ब)** उपरोक्त गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेस चालवत असलेले क्लोकरुम व्यवसाय पतपेढीकडून काढून घेणे व पुढे तात्पुरते चालु ठेवणे असल्यास लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर प्रस्तुत व्यवसाय तात्पुरते एक वर्षासाठी चालविणेस देणेसाठी प्रति महिना लिव्ह अॅन्ड लायसेन्स फी ठेकेदार किती देणार याबाबतीत निविदा मागविणे.

याकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३३ संस्था साईनाथ छाया इमारतीत चालवत असलेल्या क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसायास पुढील पाच वर्षा करीता मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्र ४४१ अन्वये सविस्तर चर्चा होवून साईनाथ छाया इमारतीत क्लोकरुम व मोबाईल ठेवणेकामी एकत्रित ५ वर्षाकरीता तत्वता: मान्यता देऊन प्रती ११ महिने कालावधीसाठी ( १०% प्रतिवर्षी वाढ करुन ) करार करणेत यावा, असे ठरले आहे. होते त्यास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीस संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ०५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फुट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर पाचव्या वर्षा करीता दि.१७/०७/२०१३ ते दि.१६/०६/२०१४ अखेर ११ महिन्याचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु. ८,८५८/- मात्र व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन देण्यात आला होता. सदरचे व्यवसायाची मुदत दि. १६/०६/२०१४ रोजी संपुष्टात येत असल्याने दि. ०८/०५/२०१४ रोजीचे पत्राने पुढील पाच वर्षा करीता मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरांबाद यांनी पी.आय.एल. नं. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. १२०५६/२०१२ मध्ये दि. १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशात पॅरा नं. ६ (अ) मध्ये without prior permission of the Court the committee shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent no.२ turst; असा असून त्यात मा.कोर्टाचे पुर्व परवानगीशीवाय कमिटीने संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये, असा आदेश झालेला आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाने दि. २८/१०/२०१३ रोजीचे पत्र संस्थानला ( संजय काळे विरुध्द महाराष्ट्र शासन पी.आय.एल. नं. २५/२०१२ चे अनुशंगाने ) प्राप्त झाले असून सोसायटीचे पेढा विक्री मुद्याचे अनुशंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करणेचे संस्थानला सुचीत केले आहे. **:-**

" मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यासाठी सोसायटीकडून अतिशय नाममात्र परवाना फी घेण्यात येत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत असल्याने प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सोसायटीकडून काढून घेण्यात यावे व त्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात याव्यात.

मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा पुरविण्यास सोसायटीस दिल्यामुळे संस्थानचे आर्थीक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मा.जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचा समावेश असलेल्या समितीमार्फत याबाबत सविस्तर चौकशी करण्यात यावी व त्यांच्या अहवालानुसार व शिफारशीनुसार पुढील कारवाई करण्यात यावी. "

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि. ०८/०५/२०१४ चे पत्राने साईनाथ छाया इमारतीत चालवत असलेले क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसाय पुढील पाच वर्षा करीता चालविण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे. परंतू शासनाचे उपरोक्त मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधाबाबतचे निर्देश लक्षात घेता सदर बाबत प्रकरणी चौकशी मध्ये अढळ बाबी /खालील माहिती अढळ राहील.

मोबाईल व चप्पल स्टॅन्ड सुविधा भक्तांचे सोयीसाठी सुरु केलेली आहे. त्यामध्ये नफा किंवा आर्थीक फायदा मिळविणेचा संस्थानचा उद्देश नाही. तसेच त्यामुळे आर्थीक नुकसानी पेक्षा भक्तांचे

सुविधांचा विचार करणेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सोसायटीकडून लिव्ह अॅन्ड लायसेन्स फी आकारणेत येत आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटी ही सोसायटी रजिष्ट्रेशन अॅक्ट कायद्याखाली नोंदलेली संस्थान नोकरांचे संबंधीत सहकारी संस्था आहे त्यामुळे खाजगी व्यक्ती नाही. त्यामुळे भक्तांना सुविधा जबाबदारीने देऊ शकते त्यामुळे सोसायटीकडून प्रामुख्याने मोबाईल चप्पल स्टॅन्ड काढून न घेता व जाहिर निविदा न काढता प्रतीवर्षी (१०% वाढ करुन ) नुतनीकरण करणेत यावे अशी शिफारस वजा अभिप्राय शासनास सादर केलेला आहे.

तरी क्लोकरुम सुविधा पुरविणेबाबत संस्थानचा नफा मिळविणेचा प्रामुख्याने प्रस्तुतचा उपक्रम नाही. तर भक्तांना सुविधा देणेबाबतचा हेतू आहे . करीता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि.०८/०५/२०१४ चे पत्राने साईनाथ छाया इमारतीत चालवत असलेले क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसायाची मुदत दि. १७/०६/२०१४ नंतर पुढील एक वर्षासाठी मागील (भु-भाडे) लिव्ह अँन्ड लायसेन्स फी रु. ८,८५८/- मध्ये १० % वाढ करुन ( रु. ९,७४४/- मात्र ) व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने मुदतवाढ देणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३४ शिर्डीतील सर्व पक्षीय साईभक्त यांचे निवेदनाबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २४/०६/२ ०१४ रोजी शिर्डीतील सर्व पक्षीय युवक साई भक्त यांनी निवेदन देवून असे नमुद केले आहे की, या निवेदनाव्दारे असे निदर्शनास आणून देतो की, दि. २३/०६/२०१४ रोजी शंकराचार्य यांनी आपल्या सर्वांचे तसेच देश विदेशातील लाखो साई भक्तांचे दैवत श्री साईबाबा यांच्या विषयी आक्षेपार्य विधान केले आहे. त्यामुळे आमच्या सारख्या लाखो साईभक्तांच्या भावनांना ठेच पोहचली आहे. त्याचा आम्ही तिव्र निषेध करतो. यापुर्वीही अशा प्रकारची आक्षेपार्य घटना घडलेल्या आहेत परंतू श्री साईबाबा संस्थानानी अशा घटनांकडे गांभिर्यने न घेतल्याने त्यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे आपण या घटनेची तिर्व गांभिर्यने दखल घेवून श्री साईबाबा संस्थान मार्फत संबंधीतांवर कायदेशीर कार्यवाही करुन त्यांना श्री साईबाबांचे श्री साईचरित्र पाठवून त्यांच्या शंकेचे निरसन करणारी माहिती देवून त्यांना माफी मागण्यास भाग पाडावे अन्यथा या सर्व घटणांच्या निषेधार्थ तीव्र स्वरुपात आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात नमुद केले आहे.

शिर्डी ग्रामस्थ यांनी दि.३०/०६/२०१४ रोजी निवेदन देऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेशी नाम साध्यर्म्य असलेले ट्रस्टबाबत अक्षेप घेतलेला आहे. तसेच स्वामी स्वरुपानंद यांनी नुकतेच श्री साईबाबांविषयी अनेक बेजबाबदार, बेताल आणि विसंगत अशी वक्तव्ये केली आहेत. त्यांचा आम्ही शिर्डीकर साईभक्त म्हणुन तीव्र निषेध करतो. त्यांनी केलेल्या अनेक आरोपापैकी एक आरोप असा आहे की संस्थानच्या दानपेटित जमा होणारी देणगी ही विदेशात जाते आणि या सर्व प्रकारामागे विदेशी शक्ती आहेत असा स्वामी स्वरुपानंद यांचा समज झालेला आहे.त्यांनी केलेल्या आरोपात बिलकुल तथ्य नाही.परंतु अशा प्रकारे गैरसमज होण्याचे अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक असे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असे आपले संस्थानचे नाव नोंदणी केलेली आहे याच नावाशी साधर्म्य असणारे अनेक ट्रस्ट किंवा संस्था संबंध भारतातच नव्हे तर विदेशातही आहेत आणि त्यामाध्यमातुन अशा बोगस संस्था करोडो रुपयाचा निधी स्वर्थासाठी गोळा करातात. इतकेच नाही तर बाबांची समाधी शिर्डीतच आहे. परंतु पुणे जिल्हयातील शिरसगाव येथे प्रति शिर्डी वसविण्यात येऊन त्याठिकाणी बाबांची हुबेहुब समाधी देखिल साकरली आहे.कालांतराने बाबाची समाधी कोठे आहे याबाबत साईभक्तांमध्ये सभ्रंम निर्माण होण्याची शक्याता आहे.यांचा संस्थानने ग्रांभियाने विचार करुन असा बोगस संस्थाना आळा घालुन त्यांचा बिमोड करावा असे शिर्डीकर साईभक्त यांनी निवेदनात म्हटले आहे.सदर पत्राच्या प्रती त्यांनी अहमदनगर मतदार संघाचे खासदार श्री दिलीप गांधी व शिर्डी मतदार संघाचे खासदार श्री सदाशिव लोंखडे यांना तसेच विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य व कायदा मंत्रालय, केंद्रसरकार, दिल्ली यांना दिलेल्या आहे. या सर्व घटणांबाबत तीव्र स्वरुपात आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात नमुद केले आहे. याबाबत अनेक साईभक्तांनचे मनोगत व्यक्त करणारी पत्रे आलेली आहेत.सदर पत्रे माहितीसाठी जोडलेली आहेत.

उपरोक्त दोनही पत्रान्वये शिर्डी ग्रामस्थानी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करु असे कळविले आहे. तरी सदर प्रकरणी संस्थान पॅनलवरील ॲड. एस.डि. कुलकर्णी, कोपरगाव यांचे मार्गदर्शन घेऊन पुढिल कार्यवाही करता येईल. सदर प्रकरणी योग्य तो आदेश होणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४४ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, या प्रकरणी संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३५ श्रींची समाधी तसेच मुर्तीवर प्रकाश योजनेसाठी नवीन पध्दतीची LED लाईटींग देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** देणगीदार साईभक्त श्री.बी.रघु आलेख, मॅनेजिंग डायरेक्टर, उबेर प्रोजेक्ट लाईटींग प्रा. लि., हैद्राबाद (आंध्र प्रदेश) यांनी दि. २६-०७-२०१४ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब यांची भेट घेउन श्रीं ची समाधी तसेच मुर्तीवर प्रकाश योजनेकरीता सध्या बसविण्यात आलेल्या रेग्युलर लाईटींगऐवजी नवीन पध्दतीची LED लाईटींग करणेबाबत सुचविलेले असुन त्याबाबत माहीती पुस्तक सादर केलेले आहे.

देणगीदार साईभक्त श्री. बी. रघु आलेख, मॅनेजिंग डायरेक्टर, उबेर प्रोजेक्ट लाईटींग प्रा. लि., हैद्राबाद (आंध्र प्रदेश) यांनी सादर केलेल्या माहीती पुस्तकात नवीन पध्दतीची LED लाईटींगचा आऊटपुट हा सद्या वापरात असलेल्या सी. एफ़. एल. लॅम्प आणि साध्या बल्बपेक्षा चांगली असल्याचे कळविलेले आहे. सध्या वापरात असलेले साधे बल्ब हे जास्त वॅटेजचे असुन त्याच्या वापरामुळे उष्णतापण जास्त निर्माण होत असते तसेच सी. एफ़. एल. लॅम्प हे कमी वॅटेजचे असुन त्याच्या वापरामुळे त्याच्या आजुबाजुचे ठिकाण कंटाळवाणे दिसत असल्याचे कळविलेले आहे. परंतु नवीन पध्दतीची LED लाईटींग ही कमी वॅटची, जास्त आउटपुट देणारी तसेच कोणतीही वस्तु एकदम ठळक दिसत असल्याचे एका फ़ोटोवरुन त्यांनी दाखविलेले आहे.

देणगीदार साईभक्त श्री. बी. रघु आलेख, मॅनेजिंग डायरेक्टर, उबेर प्रोजेक्ट लाईटींग प्रा. लि., हैद्राबाद (आंध्र प्रदेश) यांनी सदरची नवीन पध्दतीची LED लाईटींग ही श्रीं ची समाधी तसेच मुर्तीवर प्रकाश योजनेकरीता वापरण्याचे सुचविलेले आहे. त्यामूळे श्रीं ची समाधी तसेच मुर्ती ही आता वापरत असलेल्या लाईटींग सिस्टीमपेक्षा जास्त ठळकपणे दिसुन येईल तसेच जास्त फ़ायदेशीर असल्यामुळे नवीन पध्दतीची LED लाईटींग वापरण्याची विनंती केलेली आहे.

तरी सदरची नवीन पध्दतीची LED लाईटींग प्रायोगिक तत्वावर देणगीदार साईभक्त श्री. बी. रघु आलेख, मॅनेजिंग डायरेक्टर, उबेर प्रोजेक्ट लाईटींग प्रा. लि., हैद्राबाद (आंध्र प्रदेश) यांचेकडून देणगी स्वरुपात बसवून घेणेस तसेच त्याचे परीणाम चांगले दिसुन आल्यास सदर मटेरीयलची देणगी पावती त्यांना देणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४५ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.बी.रघु आलेख, मॅनेजिंग डायरेक्टर, उबेर प्रोजेक्ट लाईटींग प्रा.लि., हैद्राबाद (आंध्र प्रदेश) हे देणगी दाखल देत असलेली, श्रींची समाधी तसेच मुर्तीवर प्रकाश योजनेसाठी नवीन पध्दतीची LED लाईटींगची टेस्टींग घेण्यात यावी व त्यानंतर योग्य वाटल्यास सदरहू लाईटींग कायमस्वरुपी ठेवण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ माहे ऑगस्ट, २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **ऑगस्ट,२०१४** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | आंध्रा बँक, शिर्डी | ८/८/२०१४ | २७,५४,१५,१७१/- |
| २) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १३/८/२०१४ | २५,३६,५४,१२२/- |
| ३) | आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | १३/८/२०१४ | ४,६८,८७८/- |
| ४) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २०/८/२०१४ | ४६,३६,९१,८७९/- |
| ५) | कॉर्पोरेशन बँक, शिर्डी | २७/८/२०१४ | ३८,६९,७५,६६०/- |
| ६) | विजया बँक, शिर्डी | ३०/८/२०१४ | ३५,४०,८२,४२६/- |
| ७) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे ऑगस्ट २०१४ अखेर | | १०,००,००,०००/- |

गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम ______________________

**एकूण रक्कम १८३,४२,८८,१३६/-**

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम **रु. १८३.४२ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत.

प्रचलित कार्यपद्धतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिंग सेवा देतात. वैधानिक लेखापरिक्षणात लेखापरिक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरून बँकिंग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१८३.४२ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक, राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रु.१८३.४२ मात्र कोटी रक्कमेची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३७** **युनियन बँक ऑफ इंडियाच्या कक्षासाठी दिलेल्या जागेच्या कररनाम्याचे सन २०१४-१५ या वर्षासाठी नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** युनियन बॅक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थानमधील साईनाथ छाया या इमारतीतील ३३.८७ स्वेअर फुट जागा करारानुसार मासिक भाडे तत्वावर देण्यात आलेली आहे. त्याची मुदत दिनांक ३१/०३/२०१३ रोजी संपलेली आहे. बॅकेच्या दिनांक १६/०७/२०१४ चे पत्रान्वये दिलेल्या जागेच्या करारनाम्याचे नुतनीकरण करण्याची विनंती केलेली आहे. युनियन बॅक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी ही संस्थानला चांगल्याप्रकारे बँकींग सेवा पुरवत आहे. बॅक संस्थानला पुरवित असलेल्या सेवा पुढीलप्रमाणे आहेत:

(१) दक्षिणा पेटी मोजणीसाठी हजर राहून प्राप्त झालेली रक्कम ताब्यात घेवून, त्याची संस्थानला त्याच ठिकाणी पोहोच देणे.

(२) संस्थानमध्ये जमा झालेली दैनंदिन रोख रक्कम संस्थानच्या लेखाशाखेतील रोखपाल कार्यालयात येऊन, संस्थानच्या बचत खात्यावर जमा करणे.

(३) संस्थानला देणगी स्वरुपात आलेले चेक/डी.डी. पैकी काही भरणा या बॅकेत जमा करण्यात येतो.

(४) संस्थानमधील काही विभागांचे मासिक पगार या बॅकेमार्फत करण्यात येतात.

(५) संस्थानचे बहुतांशू देयकांचे धनादेश, RTGS या बॅकेव्दारे अदा केले जातात. बॅंक यासाठी कोणताही आकार लावत नाही.

(६) श्री साईभक्तांना देणगीसाठी या बॅकेने Netbanking सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

युनियन बॅंक ऑफ इंडियाने त्यांच्या १६/०७/२०१४ चे पत्रान्वये सदर जागेस ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ या वर्षासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. बॅकेने मार्च २०१४ अखेर असलेले मासिक भाडे रुपये २१,१७५/- प्रमाणे रक्कम संस्थानखाती जमा केलेली आहे. करारमान्याचे नुतनीकरण पुढील वर्षासाठी करतांना आकारीत असलेल्या मासिक भाड्यामध्ये १०% वाढ करुन कराराम्याचे नुतनीकरणे करावे, असा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने याबाबत घेतलेला आहे. त्याप्रमाणे सन २०१४-२०१५ या वर्षासाठी मागील भाड्यात १०% वाढ गृहीत धरता रुपये २३,३००/- मासिक भाडे आकार बॅकेस लावून, करारनाम्याचे नुतनीकरण करता येईल. बॅकेस संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत मा. उच्च न्यायालयाने CA No.३६८६/२०१४ प्रमाणे परवानगी दिलेली आहे. बॅकेने संस्थानच्या जागेत फक्त ATM ठेवले असून, बॅंकेची शाखा इतरत्र स्थलांतरीत केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे युनियन बॅंकेच्या ATM / कक्षासाठी संस्थानच्या घ्साईनाथ छायाङ इमारतीमध्ये देण्यात आलेल्या जागेचे पुढील एक वर्षाच्या करारनाम्याचे दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ या कालावधीसाठी मासिक भाडे रुपये २३,३००/- प्रमाणे नुतनीकरण संस्थानच्या विधी विभागामार्फत करण्यास तसेच सदर विषय भाडे करारनाम्याबाबत असल्याने यापुढील सर्व भाडेकराराचे नुतनीकरणाचे कामकाज व संबंधीत कार्यवाही संस्थानच्या विधी विभागामार्फत होणेबाबतच्या कार्यवाहीस आपली मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३८ गावरान तुप बॅच नं. F-०२, Mfg Date- June, २०१४ चे दोन नमुने तातडीने तपासणीसाठी मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नाशिक यांचे लॅबकडे पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतूद: अधिनियम २१(१) (घ) साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१२.०४.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागाकरीता आवश्यक गावरान तुप खरेदी करणेस मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने मान्यता दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाचे संदर्भिय निर्णयानुसार गावरान तुपाचे प्रत्येक पुरवठयाच्या तारखेची पुर्वकल्पना याचिकाकर्ता यांना देवून त्यांचेसमक्ष नमुने घेणे, एक नमुना संस्थानकडे राखुन ठेवून दुसरा नमुना याचिकाकर्ता यांना त्यांचे मर्जीनुसार कोणत्याही लॅबमध्ये तपासणी साठी देणे व तिसरा नमुना संस्थानमार्फत अहमदनगर येथिल जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेमध्ये रासायनिक तपासणीसाठी पाठविणे इ. कार्यवाही करावी लागते.

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार गावरान तुप खरेदीकामी निन्मतम दराचे निविदाधारक मे. अजंन्ता राज प्रोटिन्स लि., आग्रा यांचे दर मान्य करण्यात आले असुन त्यानुसार त्यांना खरेदी विभागामार्फत एप्रिल २०१४ ते सप्टेंबर २०१४ या कालावधीकरीता पुरवठाआदेश देण्यात आलेला आहे.

दि.०५.०६.२०१४ रोजी गावरान तूपाचे डबे असलेली गाडी नं UP-८० -BK ९७४१ मध्ये बॅच नं F-०२, Mfg Date June २०१४ भांडार विभागात सकाळी १०.०० वा.आली. दि.०६/०६/२०१४ रोजी गाडी खाली करणेपुर्वी, याचिकाकर्ता श्री. संदीप कुलकर्णी यांना दुपारी १२.२३ वा फोन केला असता तुमच्या पद्धतीने काम चालु ठेवा, मी दोन-तीन दिवसांनी पाहील असे सांगीतले, तसेच दुपारी १२.२६ वा. श्री राजेंद्र गोंदकर यांना फोन केला असता, गाडी खाली करुन घ्या, मी उद्या येईल असे सांगीतले. श्री संदीप कुलकर्णी व श्री राजेंद्र गोंदकर हे दोघेही आले नाहीत. त्यामुळे दि.०९.०६.२०१४ रोजी गावरान तुपाचे बॅच नं F-०२, Mfg Date June २०१४ चे दोन नमुने काढण्यात आले असुन एक नमुना तपासणीसाठी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे जा.नं. एसएसएस/ भांडार/ ११९३ दि. ०९.०६.२०१४ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आला व दुसरा नमुना संस्थानकडे सुरक्षीत ठेवण्यात आलेला

आहे. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडील तपासणी अहवाल दि. १३/०६/२०१४ रोजी प्राप्त झालेला असुन, त्यानुसार गावरान तुपाचा वापर सुरु करण्यात आलेला आहे.

दि. ०९.०७.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वा. श्री संदीप कुलकर्णी भांडार विभागामध्ये आले, त्यांनी गावरान तुपाबाबत चौकशी केली. गावरान तुप वापरण्यास योग्य आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडील रिपोर्ट नुसार वापरण्यास योग्य आहे व त्यानुसार वापरण्यास सुरवात केली आहे, असे त्यांना सांगीतले. ते म्हणाले की, काही हरकत नाही, मी जातो व ते निघुन गेले.

श्री संदीप कुलकर्णी पुन्हा दुपारी ०३.३० वा. भांडार विभागामध्ये आले, त्यावेळी त्यांचेबरोबर श्री नितीन मिराणे-प्रेस फोटोग्राफर हे कॅमेरा घेउन आले. श्री संदीप कुलकर्णी म्हणाले की, मी जुन्या प्रसादालयातील लाडु निर्मिती विभागात जाउन आलो, तेथे तुपाचा वास येतो याबाबत मला चौकशी करणे आहे. त्यामुळे लाडु निर्मिती विभागाचे प्र.अधिक्षक श्री धनेश्वर व प्रसादालय विभागातील श्री संजय शिंदे यांना बोलावुन घेउन आम्ही सर्वजन जुन्या प्रसादालयातील लाडु निर्मिती विभागामध्ये गेलो, तेथे बॅच नं. F-०२, Mfg Date June २०१४ चे त्यांनी सांगीतलेले दोन डबे उघडण्यात आले. त्या दोन्ही डब्यातील तुपाची तेथील आचारी, त्यांनी स्वत: व त्रयस्त व्यक्ती म्हणुन साईभक्तांस तुपाची चव घेण्यास सांगीतली व दोन्ही डब्यातील तुपाच्या सॅम्पलची मागणी केली, तदनंतर ते दोन्ही डबे भांडार विभागामध्ये आणले व दोन्ही डब्यातले तुपाचे नमुने दोन वेगवेगळया प्लॅस्टीक बरणीमध्ये घेउन सदरची बरणी सिलबंद करुन त्यावर भांडार विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी हा शिक्का मारुन गावरान तुप, मोहक ब्रॅन्ड बॅच नं. . F-०२, Mfg Date June २०१४ असे नमुद करण्यात आले. सदरचे सिलबंद दोन्ही बरण्या श्री संदिप कुलकर्णी यांचेकडे देण्यात आल्या. हि संपुर्ण प्रक्रिया करीत असताना प्रेस फोटोग्राफर श्री नितिन मिराणे यांनी कॅमेराद्वारे चित्रिकरण केले आहे, सदरचे चित्रिकरण दुपारी ०३.०० ते ०५.३० या दरम्यान केले आहे. तसेच श्री संदिप कुलकर्णी यांनी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडील गावरान तुपाचे बॅच नं F-०२, Mfg Date June २०१४ चे तपासणी रिपोर्टची मागणी केल्याने त्यांना त्याची झेरॉक्स प्रत देण्यात आली. त्यावेळेस भांडार विभागातील प्र.अधिक्षक- श्री ए.एम.लाड, लाडु निर्मिती विभागाचे प्र.अधिक्षक श्री एस.डी. धनेश्वर, प्रसादालय विभागातील लॅब संबंधी काम पहाणारे श्री संजय शिंदे, व मदतनिस श्री रमेश क्षिरसागर व श्री राजेंद्र गुंजाळ हे उपस्थित होते.

दि. ०९.०७.२०१४ रोजी संध्याकाळी ०६.३० वाजता मा. उपकार्यकारी अधिकारी श्री शिंदे सो. यांनी भांडार विभागात राउंड घेतला, त्यावेळी त्यांचेसमवेत मा. मुख्यलेखाधिकारी श्री झिरपे सो., प्रशासकीय अधिकारी श्री गोंदकर सो., श्री उगले सो. व श्री गर्कल सो. हे उपस्थीत होते. त्यांनी गावरान तुप बॅच नं. F-०२, Mfg Date June २०१४ चे दोन सिलबंद असलेले डबे उघडण्यास सांगुन , त्यातील तुपाची पाहणी केली व दोन्ही डब्यातील तुपाचे सॅम्पल दोन वेगवेगळ्या बरण्यामध्ये घेण्यात येउन त्यांनी दोन्ही सॅम्पल तपासणीसाठी तात्काळ मे. अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, नासिक यांचे लॅबकडे पाठविणेबाबत निर्देश दिले आहेत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-**

**अ)** सदरचे दोन्ही सॅम्पल तपासणीकामी पाठविण्याचे असल्याने, दोन्ही सॅम्पलचे तपासणीचा खर्च अंदाजे रु. ५०,०००/- येईल, तरी सदरचे खर्चास मंजुरी असावी. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेता येईल.

**ब)** प्रसादालय किराणामाल, गावरान तुप, खाद्यतेल आदी तपासणीकामी सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. १,२५,०००/- ची तरतुद करण्यात आली आहे, तथापी सदर रक्कम वापरण्यात आल्याने उर्वरीत सहा महिन्यासाठी (जुलै ते डिसेंबर २०१४ अखेर) बजेट तरतुद करावी लागेल, त्याकामी अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- (तीन लाख रुपये मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त **'अ'** चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस व **'ब'** च्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ व ब प्रमाणे मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.३९ प्रसादलाडू व नाष्टा पाकिटे विक्रीसाठी संगणकीय कुपन छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१५ ऑगस्ट २०१३ पासून साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे ज्या साईभक्तांना जादा प्रसाद लाडू पाकीटांची आवशकता आहे अशा साईभक्तांना प्रत्येकी ५० ग्रॅम वजनाचे ०३ लाडू असलेले पाकिट रु.२०/- प्रति पाकिट यादराप्रमाणे लाडू विक्री काउन्टरवर विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आलेले आहेत.तसेच सकाळी ६ ते १० या वेळेत रु.४/- प्रति पाकिट या दराप्रमाणे नाष्टा पाकिटांची देखील विक्री करण्यात येते.लाडू काउंन्टर वर पैसे घेवून प्रसाद लाडूची प्रत्यक्ष विक्री केली जाते.त्यासाठी भक्तांना कुपन देण्याची पध्दती अवलंबविण्यात येत नाही. कुपन घेवून नाष्टा पाकिट विक्री करतांना साईभक्तांनाकडून पैसे घेतलेनंतर छापील कुपन देण्यात येते व त्यानंतर कुपन घेवून नाष्टा पाकिट दिले जाते. वर्षभरात अंदाजे १,६५,००,००० साईभक्त प्रसाद लाडू व २५,००,००० साईभक्त नाष्टा पाकिटांचा लाभ घेतात.

दि.२४/०६/२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षेतेखाली झालेल्या सभेमध्ये लाडू व नाष्टा पाकिट विक्री करणेपुर्वी संबधीताना कुपन पावती देण्याबाबत प्रस्ताव सादर करावा असे सुचविण्यात आलेले आहे साईटेक प्रकल्पाअंतर्गत प्रसाद लाडू विक्री काऊन्टरवर ४ व नाष्टा पाकिट विक्री काउन्टरवर १ असे एकूण ५ संगणकीय संच बसविणेचे नियोजन आहे. याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.संगणक संच बसविलेनंतर साईभक्तांना कुपन/पावती देणे जरुरीचे आहे.मात्र त्या करीता संगणकीय पावती देणेसाठी संगणक कुपन छपाई करुन घेणे गरजेचे आहे.

साईभक्तांना प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटांचे संगणकीय कुपन पावती देणेची कार्यवाही कायम स्वरुपी करावयाची असलेने खालील प्रमाणे वार्षिक कुपन/पावती छपाई करुन घेणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **मागणी** | **अंदाजे दर** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|---|
| १. | प्रसाद लाडू कुपन | ३०,००,००० | रु.७० प्रति हजार | २,१०,०००.०० |
| २. | नाष्टा पाकिटांचे कुपन | २०,००,००० | रु.७० प्रति हजार | १,४०,०००.०० |
| | | | | ३,५०,०००.०० |

**अक्षरी रुपये - तीन लाख पन्नास हजार मात्र.**

वरील प्रमाणे छपाईसाठी होणारा खर्च खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या कॅन्टीन खर्च बजेट रक्कम रु.१३,९२,४७,०००/- मधुन करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट-** मत सन २००४ मधील महाराष्ट्र शासन विधान मंडळाचे अधिनियम राज्यापालांना प्रस्थापीत केलेले विनियम मधील १७ (१) मध्ये भक्तगणंना आवश्यक ज्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी तरतुद करण्यात आलेली आहे प्रसाद लाडू व नाष्टा पाकिट देणेपुर्वी प्रथम साईभक्तांना संगणकिय कुपन / पावती देणेची सोय उपलब्ध करुन दयावयाची असलेन विनियम मधील १७ (१) चे तरतुदी नुसार संस्थान अधिनियमानुसार सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संगणकिय कुपन/ पावती खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने छपाई करुन घेता येईल.

तरी याकामी रु.३,५०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद व अन्न पाकिटे विक्रीसाठी विहीत पध्दतीने संगणकीय कुपन छपाई करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.४० डॉ.भाऊसाहेब भागवत साबळे, वैद्यकिय अधिकारी, श्री साईनाथ रुग्णालय यांचे रिट पिटीशन क्र.५८७२/ २०१३ बाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. साबळे यांनी आवश्यक वेतनश्रेणी व इतर भत्ते (इन्सेन्टीव्ह) मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचेसमोर रिट पिटीशन क्र. ५८७२/२०१३ दाखल केले होते. मा. न्यायालयाने या प्रकरणी दि. २३.०४.२०१४ रोजी निर्णय दिला आहे की, व्यवस्थापनाने अर्जदाराच्या दि. २३.०८.२०१२ व दि. ०५.०९.२०१२ रोजीच्या अर्जावर सहा महिन्याचे आंत निर्णय द्यावा. तसेच डॉ. साबळे यांनी इन्सेन्टीव्ह साठी स्वतंत्र पिटीशन नं. ५९७९/२०१३ दाखल केले होते. त्याबाबत आणखी एक स्वतंत्र टिपणी सादर केलेली आहे.

**डॉ. भाऊसाहेब भागवत साबळे यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास खालील प्रमाणे -**

डॉ. साबळे यांची जा. क्र. एसएसएस/वशी ०१/१६०३/१९९१ द. ०४.१२.१९९१ अन्वये वैद्यकीय अधिकारी या पदावर ३०००-१००-३५००-१२५-४५०० वेतनश्रेणीत नेमणूक करण्यात आली. त्यानुसार ते दि. ०७.०२.१९९२ रोजी संस्थान सेवेत हजर झालेले आहेत. सध्या त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनबँड रु. १५,६००-३९,१०० ग्रेड पे ६६०० मध्ये एकूण वेतन रु. ९४,९१७/- देण्यात येते. तसेच त्यांना वेळोवेळी वार्षिक वेतनवाढ नियमाप्रमाणे दिल्या आहेत. सेवाजेष्ठतेनुसार अ. नं. १ वर डॉ. आर. के. कुलकर्णी असून अ. नं. २ वर डॉ. साबळे आहेत.

डॉ. साबळे यांनी यापूर्वी दि.०१.०९.२०११ रोजीचे अर्जान्वये सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती, समान पदविधारकाप्रमाणे वेतन व भत्ते (इन्सेन्टीव्ह) यांची मागणी केली होती परंतू मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४.०१.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६९ अन्वये डॉ. साबळे यांची सदरची विनंती अमान्य करण्यात आलेली आहे.

डॉ. साबळे यांना सध्या महाराष्ट्र शासनाच्या मंजूर आकृतीबंधानुसार त्या वेतनश्रेणीत पगार देण्यात येत आहे. सेवा जेष्ठतेनुसार अ. नं. १ वर डॉ. आर. के. कुलकर्णी आहेत. डॉ. साबळे यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास बघता त्यांना आतापर्यंत विविध प्रकारच्या गैरशिस्त वर्तनाबद्दल पंधरा वेळा शासन झालेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता त्यांच्या दि. २३.०८.२०१२ व दि. ०५.०९.२०१२ रोजीच्या अर्जातील विनंती अमान्य करता येईल.

तरी डॉ. साबळे यांचे दि. २३.०८.२०१२ व दि. ०५.०९.२०१२ रोजीचे विनंती अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.भाऊसाहेब भागवत साबळे, वैद्यकिय अधिकारी, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.२३.०८.२०१२ व दि.०५.०९.२०१२ रोजीच्या अर्जान्वये, आवश्यक वेतनश्रेणी व इतर भत्ते (इन्सेन्टीव्ह) मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४१** **डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो.कन्सल्टंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांचे रिट पिटीशन क्र.८९११/ २०१३ बाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. कांबळे यांनी नेमणूकीचे सुरुवाती पासून वार्षिक वेतन वाढ व वेतनश्रेणी मिळावी. यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपिठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र. ८९११/२०१३ दाखल केले होते. त्यात मा. न्यायालयाने दि. १९.०३.२०१४ रोजी असा निर्णय दिला की, जाब देणार यांनी अर्जदाराच्या दि.०९.०९.२०१२ आणि दि. २३.०२.२०१३ रोजीच्या अर्जावर दोन महिन्याचे आंत निर्णय घ्यावा. इकडील जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/७२/२०१४ दि. १३.०५.२०१४ अन्वये त्याप्रमाणे डॉ. कांबळे यांना कळविणेत आलेले आहे. परंतु त्यानंतर डॉ. कांबळे यांनी पुन्हा दि. २५.०५.२०१४ रोजी याकामी विनंती अर्ज सादर केलेला आहे. याबाबत पूर्व इतिहास खालील प्रमाणे आहे.

सुरुवातीस मा. महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मान्यता नसलेने डॉ. कांबळे यांची जा. नं. एसएसएस/ वशी ०१/ १०९७०/ २००५ दि. ०१.१०.२००५ अन्वये दि. ०१.१०.२००५ पासून वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) या पदावर शासनाच्या मान्यतेस अधीन राहून दरमहा रु. २१,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली. त्यास अनुसरुन ते दि. १४.१०.२००५ रोजी संस्थान सेवेत रुजु झाले. त्यानंतर दि. ०१.१०.२००६ पासून त्यांचे मासिक मानधन रु. २१,०००/- वरुन वाढ करुन रु. ३०,०००/- करण्यात आले. आकृतीबंधास महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र. सासंवि-२००९-४३३/(३७/०९) का. सोळा दि.०७.०८.२००९ अन्वये मान्यता मिळाली. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार जा. नं. एसएसएस/ वशी ०१/ १२०५/२०१० दि. १०.०४.२०१० अन्वये डॉ. कांबळे यांना दि. ०१.०४.२०१० पासून वेतन बँड रु. १५,६००-३९,१०० ग्रेड पे ६,६०० मध्ये वेतन अदा केले जात आहे. त्यानुसार दरवर्षी वार्षिक वेतन वाढ देण्यात आलेली आहे.

अशाप्रकारे दि. १३.०६.२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधात त्वचारोग तज्ञ पदास मंजूरी नसलेने डॉ. कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती. ती त्यांनी त्यावेळी स्विकारलेली आहे. दि.०७.०८.२००९ रोजीच्या आकृतीबंधात पदाचा समावेश असलेने त्यांना दि. ०१.०४.२०१० पासून वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना सुरुवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी व वार्षिक वेतन वाढ देता येणार नाही.

तरी देखील डॉ. कांबळे यांच्या दि.०९.०९.२०१२ व दि.२३.०२.२०१३ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो.कन्सल्टंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.०९.०९.२०१२ व दि.२३.०२.२०१३ रोजीच्या अर्जान्वये, त्यांच्या नेमणूकीचे सुरुवाती पासून वार्षिक वेतन वाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजनेअंतर्गत रु.६४ कोटी रकमेची बीले शासनाकडे विलंबाने सादर केलेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांची बिले मंजूरीसाठी शासनाकडे सादर केली जात असत. या योजने अंतर्गत शासनाचे संबंधित अॅथोरेटीला विहीत वेळेत प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे संस्थानला सदर योजने अंतर्गत शासनाकडून मिळणारी बहुतांशी बिलांची रक्कम (सुमारे ६४ कोटी रुपये) अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही, असे निदर्शनास आल्याने संबंधित जबाबदार डॉ. कौशिककुमार हिरजीभाई मकवाना, तत्कालीन प्र. वैद्यकीय संचालक-सध्याचे वैद्यकीय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना जा. नं. एसएसएस/वशी ७ए/३८८७/२०१४ दि. २५.०२.२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. डॉ. मकवाना यांनी दि. १५.०३.२०१४ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. तसेच याकामी दुसरे संबंधित अधिकारी श्री. अशोक शंकरराव वाळुंज, मॅनेजर पब्लीक रिलेशन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना जा. नं. एसएसएस/वशी ७ए/ ३८८८/२०१४ दि. २५.०२.२०१४ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्यांनी देखील दि.०८.०३.२०१४ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. याबाबतचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि.०५.०६.२०१४ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. त्या सभेत निर्णय क्र. ४०९ व ४१० अन्वये असे ठरले की, सदर प्रकरणी नैसर्गिक न्याय तत्वाचे नियमानुसार चौकशी करणेसाठी कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी व वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची समिती गठीत करुन या समितीने पूर्ण चौकशी करुन मा. त्रीसदस्य समितीपुढे अहवाल सादर करावा.

यानंतर सदर प्रकरणी दि. २६.०७.२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे कक्षात झालेल्या चर्चेमध्ये असे सुचित करण्यात आले की, सदरच्या चौकशीकामी स्वतंत्र त्रयस्थ पक्षाचे चौकशी अधिकारी/ चौकशी समिती म्हणून नेमणूक करण्यात यावी.

तरी सदर प्रकरणी नैसर्गिक न्याय तत्वाचे नियमानुसार व नि:पक्षपातीपणे चौकशी व्हावी यासाठी स्वतंत्र त्रयस्थ चौकशी समिती गठीत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जीवनदायी योजनेअंतर्गत रु.६४ कोटी मात्र रकमेच्या बीलांचे प्रस्ताव शासनाकडे विहीत वेळेमध्ये पाठविणेसाठी संबंधीतांनी जाणीवपुर्वक विलंब केला का, याची पडताळणी मुख्यलेखाधिकारी यांनी करावी व उशिराने बिले सादर करण्याच्या कारणासह झालेल्या आर्थिक नुकसानीचा अहवाल मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील परफ्युजनिस्टचे कामकाजाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ हर्षल अशोक वाळूंज यांनी दि. १६/०७/२०१४ रोजी अर्ज सादर करुन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये परफ्युजनिस्ट पदावर काम करणेस संधी मिळावी अशी विनंती केली आहे. सदरचे अर्जावर प्र. वैद्यकीय संचालक यांनी असा अभिप्राय दिला आहे की, कंत्राटी परफ्युजनिस्ट श्री बाशा हे काम सोडून गेलेले आहे. त्यांचे बदली परफ्युजनिस्टचे कामकाजासाठी डॉ हर्षल अशोक वाळूंज यांना घेण्यात यावे.

श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्ट या पदाच्या तिन जागा मंजूर आहेत. त्यापैकी एक कायम व एक ११ महिने कालावधीसाठी असे दोन कर्मचारी कार्यरत आहेत. हॉस्पिटलमधील कामाचा वाढता व्याप लक्षात घेता मा. व्यवस्थापन समितीचे दि ०८/०१/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३१ नुसार डॉ हर्षल अशोक वाळूंज यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परफ्युजनिस्ट या पदावर रु २१,०००/- मात्र प्रतिमहा वेतनावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरते कामावर घेण्यात आले होते. त्यांची ११ महिने कालावधीची मुदत दि. ०१/०१/२०१४ अखेर संपुष्टात आली होती.

मा त्रिसदस्यीय समितीचे दि. ०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१ नुसार डॉ हर्षल अशोक वाळूंज यांना ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने रु. २१,०००/- प्रतिमाह एकत्रित वेतनावर त्यांची नेमणुक संपलेचे तारखेपासून म्हणजेच दि. ०१/०१/२०१४ पासून पुढे ११ महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये जाहीरात प्रक्रीयेद्वारे परफ्युजनिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास डॉ हर्षल वाळूंज यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी, असा निर्णय झाला आहे.

त्यास अनुसरुन डॉ वाळूंज यांना दि. ०१/०१/२०१४ रोजीपासून ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेत आले होते. दरम्यानचे काळात डॉ वाळूंज हे दि. १७/०५/२०१४ पासून काम सोडून गेले होते. त्यामुळे सदरचे कामाची गैरसोय होऊ नये म्हणून श्री डी. महेबुब बाशा यांना पुर्वीचेच मंजुरीस अधिन राहून परफ्युजनिस्टचे कामकाजासाठी ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने मासिक रु. २१,०००/- वेतनावर घेणेत आले होते. परंतु तेही आता काम सोडून गेलेले आहे. परफ्युजनिस्ट पदासाठी जाहीरात प्रकाशित केलेली आहे. परंतु निवड प्रक्रियेस बराच कालावधी लागणार असल्याची शक्यता आहे. आकृतीबंधात परफ्युजनिस्टची तिन पदे मंजूर आहेत. सध्या दोनच कामावर आहेत. त्यापैकी एकजण रजेवर गेल्यास एक ऑपरेशन थिएटर बंद ठेवावे लागते.

तरी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये परफ्युजनिस्टचे कामकाजासाठी ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने एक कुशल कामगार कामावर घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१ नुसार, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये असलेली परफ्यूजनिस्टची आवश्यकता विचारात घेता, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत प्रतिमहा रु.२१,०००/- मात्र एकत्रित वेतनावर ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने परफ्यूजनिस्टची तात्पुरती नेमणूक करणेत यावी.**

**तसेच दरम्यानचे कालावधीत जाहिरात प्रक्रियेव्दारे परफ्यूजनिस्ट या पदावर योग्य उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक दिलेल्या परफ्यूजनिस्टची मुदत संपुष्टात आणणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४** **डॉ.काशिनाथ नरसोबा टिंगरे, न्यूरो सर्जन यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटिंग न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. काशिनाथ नरसोबा टिंगरे हे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जन या पदावर कार्यरत होते. ते दि. ३१/०५/२०१२ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानंतर जा.नं. १२५४ दि. ०८/०६/२०१२ अन्वये त्यांची दि. ०१/०६/२०१२ पासून रु. २४,०००/- मासिक मानधनावर सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानंतर जा.नं. १०६८ दि. १५/०१/२०१३ अन्वये त्यांची दि. ०९/०१/२०१३ पासून रु. २४,०००/- मासिक मानधनावर सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार त्यांचा नेमणूक कालावधी दि.०८/०७/२०१३ रोजी संपुष्टात आला आहे. त्यानंतर त्यांनी दि.२७/०५/२०१३, १४/०८/२०१३, ०८/०३/२०१४, दि. २७/०४/२०१४ रोजीच्या अर्जान्वये व्हिजीटींग सर्जन पदावर नेमणूक मिळावी अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये न्यूरो सर्जनची दोन पदे मंजूर आहेत. मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयांनुसार व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी एकूण २९ पदासाठी वर्तमान पत्रांत व संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातीमध्ये न्यूरो सर्जनचे दोन पदांचा समावेश करण्यात आलेला होता.

जाहिरातीस अनुसरुन विविध पदांसाठी प्राप्त पात्र अर्जदार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय निवड समिती समोर मुलाखती घेण्यात आलेल्या असून त्यात न्यूरो सर्जनचे पदासाठी तीन उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. परंतु, मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. २७१ अन्वये सदरची कार्यवाही रद्द करण्यात आली असून फेर जाहिरात देणेबाबत निर्णय झ ालेला आहे.

रुग्णालयामध्ये न्यूरो सजर्नची आवश्यकता असल्याने व जाहिरातीनुसार न्यूरो सर्जनचे पदावर वैद्यकिय अधिकाऱ्यांची नेमणूक करणेस काहीसा कालावधी लागणार असल्याने तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेले डॉ. भास्कर मधुकर केंद्रे यांना नेमणूक देणेच्या निर्णयास्तव

प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेकामी सभा कामकाज विभागाकडे देण्यात आलेला आहे. तसेच सध्या ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेले न्यूरो सर्जन डॉ. मयुर विलास म्हात्रे यांची ११ महिन्यांची नेमणूक दि. ०२/०५/२०१४ अखेर संपुष्टात आली असल्याने त्यांचे पुढील नेमणूकीबाबतचाही प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. म्हणजेच आकृतीबंधानुसार न्यूरो सर्जनची दोन पदे मंजूर आहे व दोन्ही पदांवर ११ महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक करणेकामी दोन स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

दरम्यानचे काळात सदरच्या पदांसाठी भरती करणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय-खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर विनंती अर्ज सादर केला होता. मा. न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजीच्या निर्णयाने एकत्रित मानधनावर सहा महिन्यांसाठी कन्सलटंट नेमण्यास परवानगी दिली आहे. त्यास अनुसरुन डॉ. टिंगरे यांची मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १९६ प्रमाणे मानधनावर (कन्सलटेशन चार्जेस ५०% डॉ. शेअर) व्हिजीटींग न्यूरो सर्जन पदावर नेमणूक करता येईल.

तरी, डॉ.काशिनाथ नरसोबा टिंगरे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व्हिजीटींग न्यूरो सर्जन पदावर नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५४** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.टिंगरे यांना पुढील कालावधीसाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्याची विनंती करणेत यावी व अशा कालावधीकरीता त्यांना नंतर एकत्रित मानधन मागण्याची व देण्याची व्यवस्था करावी. तथापी दि.१९.०३.२०१४ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार ६ महिन्याकरीता न्युरो सर्जनची निवड करण्यास मंजुरी दिली आहे. दरम्यान जाहिरातीव्दारे आलेल्या उमेदवारांची मुलाखती घेण्यात आल्या. परंतु व्यवस्थापन समितीने ही प्रक्रिया दि.१२.०४.२०१४ चे निर्णय क्र.२७१ अन्वये रद्द केली आहे व न्युरो सर्जन व इतर पदांकरीता नवीन जाहीरातीप्रमाणे निवड होईपर्यंत डॉ.काशिनाथ नरसोबा टिंगरे यांना तात्पुरती एकत्रित मानधनावर नेमणुक देण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४५** **डॉ.राहुल प्रकाश मोदगी, न्यूरो सर्जन यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटिंग न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. राहुल प्रकाश मोदगी यांनी दि. २६/०३/२०१३ रोजीचे अर्जाची छायांकित प्रत दि. १६/०५/२०१४ रोजी इकडील कार्यालयाकडे सादर केली असून त्यात त्यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये महिन्यातून ३ ते ४ दिवस न्यूरो सर्जन या पदावर व्हिजीटींग पध्दतीने काम करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

डॉ. राहुल प्रकाश मोदगी हे दि. ०१/१०/२००९ ते दि. १४/०४/२०१३ या कालावधीत संस्थान सेवेत होते. त्यांनी दि. १४/०४/२०१३ रोजीपासून संस्थान सेवेचा राजीनामा दिला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधात न्यूरो सर्जनची दोन पदे मंजूर असून सदरची दोन्ही पदे रिक्त आहेत. मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयांनुसार व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १३/०८/२०१३ रोजीचे आदेशानुसार उमेदवारांच्या दि. ०१/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय निवड समिती समोर मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. परंतु, सदरची निवड प्रक्रीया मा. त्रिसदस्यीय समितीने रद्द केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत असलेल्या रुग्णांची संख्या जास्त आहे. ट्रॉमा युनिटमध्ये न्यूरो सर्जन या पदाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची आवश्यकता असते.

सध्या डॉ. मयुर विलास म्हात्रे हे एकच न्यूरो सर्जन ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असून त्यांचे नेमणूकीची मुदत दि. ०२/०५/२०१४ अखेर संपुष्टात आली आहे. त्यांना पुढील नेमणूक देणेच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला आहे.

डॉ. राहुल मोदगी यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत रुग्णांवर चांगल्या प्रकारे उपचार करुन रुग्ण सेवा केलेली आहे. त्यांचे सेवेचा व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये न्यूरो सर्जनची आवश्यकता याचा विचार करता त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये महिन्यातून ३ ते ४ दिवस व्हिजीटींग पध्दतीने काम करणेस परवानगी देऊन त्यांना संस्थान प्रचलीत पध्दतीनुसार इन्सेंटीव्ह देता येईल, असे प्र. वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.राहुल प्रकाश मोदगी यांना पुढील कालावधीसाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्याची विनंती करणेत यावी व अशा कालावधीकरीता त्यांना नंतर**

**एकत्रित मानधन मागण्याची व देण्याची व्यवस्था करावी. तथापी दि.१९.०३.२०१४ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार ६ महिन्याकरीता न्युरो सर्जनची निवड करण्यास मंजुरी दिली आहे. दरम्यान जाहिरातीव्दारे आलेल्या उमेदवारांची मुलाखती घेण्यात आल्या. परंतु व्यवस्थापन समितीने ही प्रक्रिया दि.१२.०४.२०१४ चे निर्णय क्र.२७१ अन्वये रद्द केली आहे व न्युरो सर्जन व इतर पदांकरीता नवीन जाहीरातीप्रमाणे निवड होईपर्यंत डॉ.राहुल प्रकाश मोदगी यांना तात्पुरती एकत्रित मानधनावर नेमणुक देण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयामधील वार्षीक (सन २०१३-२०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक (सन २०१३-१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेत याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५६,६८,५२९/- चे खर्चास व विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार सदरचे खरेदीस दि.२६/०२/२०१४ रोजीचे आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली असून सदर खरेदीकामी पुण्यनगरी- औरंगाबाद, पुढारी- पुणे, आपला वार्ताहार- मुंबई, सार्वमत- अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तसेच www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ या कालावधीत ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच दि.०१/०४/२०१४ अखेर तांत्रीक निविदा व नमुने मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण ०८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणें

अ) छपाई-

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०५ |
| २ | मुंबई कार्यालय | ०१ |
| एकूण निविदा | | ०६ |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | में. अविराज पॅकवेल, कोपरगांव | (१ बंद निविदा प्राप्त २९.०३.२०१४) |
| २ | में. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | (२ बंद निविदा प्राप्त २९.०३.२०१४) |
| ३ | में. कृष्णा एंटरप्रायजेस, अहमदाबाद | (२ बंद निविदा प्राप्त ३१.०३.२०१४) |
| ४ | मे. राका प्रिंटर्स , नाशिक | (१ बंद निविदा प्राप्त ३१.०३.२०१४) |
| ५ | में. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| ६ | मे. क्लासीक स्टेशनर्स, मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |

ब) कार्यालयीन स्टेशनरी -

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०० |
| २ | मुंबई कार्यालय | ०२ |
| | एकूण निविदा | ०२ |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | मे. क्लासीक स्टेशनर्स, मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |
| २ | मे. श्री एंटरप्रायेस, ठाणे | (२ बंद निविदा प्राप्त ०१.०४.२०१४) |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रीक निविदा मा. त्रिसदस्य समिती सभा दि. ०८/०१/२०१४ चे निर्णय क्र. २३ अन्वये वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार उपरोक्त प्राप्त झालेल्या ई तांत्रीक निविदा वैद्यकीय संचालक यांचे समक्ष दि. ४/०४/२०१४ रोजी उघडण्यात आल्या असून, एकुण ०८ प्राप्त ऑन लाईन कमर्शियल निविदा पैकी कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तेंव्हा सदर निविदा उघडून त्यावर निर्णय घ्यावा किंवा कसे ? याबाबद निर्णय होणेस मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

उपरोक्त छपाईकामी मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१३-१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या ई-कमर्शियल निविदा तांत्रिक कारणांमुळे उघडणेस विलंब झाल्यामुळे निविदेमधील दर समजू शकले नाही व वेळेअभावी निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे उशीराने उघडलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत यावा व त्यामधील निम्नतम दर धारकास पुरवठा आदेश देणेकामी सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले आहे.

त्यानुसार तुलनात्मक तक्ता सोबत सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम दरानुसार सदरचे छपाईकामी रु.३९,४०,५२६.४० पैसे (पुर्णांकीत रक्कम रु. ३९,४०,५२६/-) इतका खर्च येणार आहे. तसेच कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी रु. ७,००,९७१/- इतका खर्च येणार आहे. छपाई स्टेशनरी व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी एकूण रक्कम रु. ४६,४१,४९७/- इतका खर्च येणार आहे.

तरी सदरची छपाई व कार्यालयीन स्टेशनरी निम्नतम दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४६,४१,४९७/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामधील पी.आय.एल. नं.१८/ २०११, सिव्हील अर्ज क्र.१७७३/ २०१४ वरील दि.२६.०२.२०१४ रोजीच्या आदेशान्वये श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयामधील वार्षीक (सन २०१३-२०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळालेली असून मा.खंडपीठाच्या आदेशास अनुसरुन निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४७** **सर्पदंशाचे इंजेक्शन A.V.S. च्या तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- दि.२६/०७/२०१३ चे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ५६४ अन्वये "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता आवश्यक असणारी औषधे व सर्जिकल साहित्य प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यपध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४८,६६,६४,२५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच उपरोक्तकामी येणाऱ्या खर्चास, संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर करणेत येऊन मा. खंडपीठाची मंजूरी घेण्यात यावी, असे ठरले."

त्यानूसार सदरचे खरेदीस दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे. सदरचे खरेदीमध्ये इंजेक्शन A.S.V. ५००० नग खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. १६,२५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे विभागात सर्पदंशाचे रुग्ण दाखल झाल्यानंतर सदर इंजेक्शनची गरज असते. सदर इंजेक्शन महत्वाचे Life Saving औषध आहे. सन २०१३-१४ या वर्षाचे वार्षिक खरेदीमध्ये सदर इंजेक्शनची एकूण ५००० Vials ची मागणी करण्यात आली होती. परंतु E-Tender मध्ये सदर इंजेक्शनसाठी कोणतेच दर प्राप्त झालेले नव्हते. तेव्हा मा. उच्च न्यायालयाने खरेदीकामी नियुक्त केलेल्या समितीने दि.१५/१९/०२/२०१४ रोजीचे सभेत याकामी मे. हाफकीन बायोफार्मा कॉर्पोरेशन लि. मुंबई या सरकारी उत्पादक कंपनीकडे थेट संपर्क साधून त्यांचेकडून दरपत्रक मागवून ते त्यांचेकडून थेट खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार मे. हाफकीन बायोफार्मा कॉर्पोरेशन लि., मुंबई यांना इकडील पत्र क्र. ७८३८ दि. १४/०३/२०१४ अन्वये पत्र पाठवून दरपत्रक मागविण्यात आले होते. परंतु मे. हाफकिन बायोफार्मा कॉर्पोरेशन लि. मुंबई यांनी त्यांचे दि.०३/०४/२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे पत्र दिले आहे.

आपले ई मेलद्वारे पाठविलेले स्मरणपत्र मिळाले. आपण पाठविलेल्या स्मरणपत्रावर जावक क्र. तारीख व सही इ. केलेली नाही. उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडे आपण मागणी केलेले Inj. A.S.V. चा साठा अत्यल्प प्रमाणात आहे. हाफकिन जीव औषध हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनातंर्गत येणाऱ्या शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जिल्हा रुग्णालयांना प्राधान्याने पुरवठा करण्यास हाफकिन महामंडळ कटीबध्द आहे.

वरील बाबी लक्षात घेता महामंडळास Inj. A.S.V. चा सद्य स्थितीत आपल्या रुग्णालयास पुरवठा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. हाफकिन महामंडळ Inj. A.S.V. व्यतिरिक्त Inj. ARS, Inj. ADS, Inj. AGGS मौखिक द्रव्ये व प्रतिजैविके टॅब्लेट्स / कॅप्सुल्स उत्पादित केली जातात त्यांची आपण खरेदी करावी ही विनंती.

तसेच सदर इंजेक्शन बनवणाऱ्या मे. भारत सिरम, मुंबई व मे. सिरम इन्स्टीट्युट, मुंबई यांना देखील दि. ०८/०४/२०१४ रोजी ई मेलद्वारे पत्र पाठवून दरपत्रक देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी मे. भारत सिरम, मुंबई यांनी कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही, तर मे. सिरम इन्स्टीट्युट, मुंबई यांनी सध्या त्यांचेकडे सदर इंजेक्शन उपलब्ध नसल्याबाबत दि.१६/०४/२०१४ चे ई-मेल पत्रान्वये कळविले होते.

तेव्हा सदर इंजेक्शनचा पुरवठा करणारे कंपनी/ अधिकृत विक्रेते यांचा Google वर शोध घेण्यात आला होता. त्यानुसार, मे. अंकिता एंटरप्रायजेस्, ठाणे यांनी दि. ०८/०४/२०१४ चे ई-मेल पत्रान्वये त्यांचेकडे सध्या ५०० व्हायल उपलब्ध होत्या व त्याचे दर रु. ८४०/- प्रति व्हायल आहे.

सदरचे इंजेक्शन बाजारातून जेथे मिळतील तेथून उपलब्ध करण्यात येत आहे. कारण त्याचा तुटवडा आहे व ती बाजारात मिळत नाही त्यामुळे रुग्णांची ऐनवेळेस मोठी गैरसोय होते. सदरचे इंजेक्शन हे रुग्णांचे आजाराचे गंभीर स्वरुपानुसार २५ Vial पासून २०० Vial पर्यंत लागू शकतात. सदरचे इंजेक्शन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांकरिता मोफत देणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि. १८/१०/२०१२ चे सभेत निर्णय क्र.८५७ (०१) अन्वये झालेला आहे. त्यामुळे ते रुग्णालयात उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. मे. विश्वेश एंटरप्रायजेस्, संगमनेर (जि. अहमदनगर) यांचेकडे सदर इंजेक्शनचा मर्यादित साठा आला होता त्यातून १०० Vials त्यांचेकडून खरेदी केलेले आहे. आता सध्या आपणाकडे जवळपास २८८ Vials चा साठा आहे व तो तातडीने केव्हाही लागू शकतो. सदरचे खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे:-

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Vishvesh Enterprises, Sangamner | 173 | 14/05/2014 | 19005.00 |
| 2 | M/s. Vishvesh Enterprises, Sangamner | 170 | 14/05/2014 | 19005.00 |
| 3 | M/s. Vishvesh Enterprises, Sangamner | 172 | 14/05/2014 | 19005.00 |
| 4 | M/s. Vishvesh Enterprises, Sangamner | 171 | 14/05/2014 | 19005.00 |
| | | | **Total** | **76020.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदरचे इंजेक्शन महत्वाचे Life Saving आहे व ते रुग्णालयात उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. सदर इंजेक्शन खरेदीसाठी वार्षीक खरेदी २०१३-१४ मध्ये ५००० Vials करीता अंदाजे रक्कम रु.१६,२५,०००/- चे खर्चास तसेच मा. त्रिसदस्य समिती व मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची देखील मान्यता आहे. परंतु वार्षिक ई-निविदामध्ये निवीदा न आल्यामुळे व Life Saving असल्यामुळे खरेदी करणेस हरकत नाही.

त्यानुसार सदर खरेदी करुन बीले अदा करुन नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.६५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामधील पी.आय.एल. नं.१८/ २०११, सिव्हील अर्ज क्र. १३२७२/ २०१३ वरील दि.२५/१०/२०१३ रोजीच्या आदेशान्वये वार्षिक औषधे खरेदीकामी येणाऱ्या खर्चास परवानगी दिलेली असून मा.खंडपीठाच्या आदेशास अनुसरुन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४८ लॉन्ड्री मशिनचे Boiler दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय या दोन्ही हॉस्पिटलमधील वापरलेले लिनन धुणेकामी आवश्यक लॉन्ड्री इक्विपमेंटस करीता बॉलयर मशिन पुरवठा आदेश क्र.१२९८७/ २००९ दि.२३.१०.२००९ अन्वये मे.रॅमसन गारमेन्ट फिनीशिंग इक्विपमेंटस (प्रा) लि., बॅंगलोर यांचेकडून एकूण रु.६,२५,४०१/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहेत. सदर मशिन्स दि.१०/०३/२०११ रोजी बसवून लॉन्ड्री विभागात श्री साईनाथ रुग्णालयाजवळ कार्यान्वीत करणेत आला आहे. कंपनीने मशिन्सकरीता दिलेला दोन वर्षाची वारंटी कालावधी संपलेला आहे. सदर मशिनचे नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी M/s Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai यांचेकडे दि.०१/०४/२०१४ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीकरीता एकूण रु.२४,१५७/- इतक्या रकमेत वार्षिक

सर्व्हिस कॉन्टॅक्ट करणेत आले आहे. सदर AMC कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्टस् व कंझ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी आदा करावयाची आहे.

सध्या लॉन्ड्री मशिनचे बॉयलर व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. १६, दि.२०/०६/२०१४ अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनी इंजिनीअर त्याचे तातडीच्या भेटीकरीता आले असता त्यांनी बॉयलर मशिनची तपासणी करुन काही स्पेअर पार्ट व Coil हे पार्ट खराब झाल्यामुळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे सर्व्हीस रिपोर्ट क्र.०१७, दि.२०/०६/२०१४ अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनीने पत्र क्र.MXM/Q/ ०७६/ १४-१५ व MXM/Q/ ०७७/ १४-१५ दि.२३/०६/२०१४ अन्वये सर्व करांसहीत एकूण रु.७१,८४३/- इतक्या खर्चाचे कोटेशन पाठविले असून कंपनीने सदर रकमेची आगाऊ मागणी केलेली आहे.

सदर बॉयलर मशिनचे स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. सदर लॉन्ड्री मशिन दोन्ही रुग्णालयाचे लिनन धुण्यासाठी नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे M/s Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बॉयलर मशिनचे स्पेअर पार्ट खरेदी करणेस हरकत नाही.

तरी M/s Maxima Boilers Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बॉयलर मशिनचे स्पेअर पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकूण रु.७१,८४३/- च्या खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील लॉन्ड्री मशिनचे बॉयलरची दुरुस्ती करणेकामी आवश्यक असलेले स्पेअरपार्ट मे.मॅक्सिमा बॉयलर्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.७१,८४३/- मात्रचे खर्चास तसेच सदरहू रक्कम कंपनीस आगाऊ देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.४९** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Working Element खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ. टी. विभागाने दि. २६/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Working Element ची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे सध्या असलेले Working Element हे सन १९९९ या वर्षी खरेदी करण्यात आलेले होते. सध्या ते वापरुन वापरुन खराब झालेले आहे. सदरचे Working Element हे युरोलॉजी शस्त्रक्रिया करण्याकरिता आवश्यक असतात. सध्या असलेले Working Element हे खराब झाल्यामुळे त्यांनी नवीन खरेदी करुन मिळणेबाबत मागणी पत्रान्वये कळविले आहे.

सदरचे Working Elements खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Karl Storz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांनी दि.२६/०६/२०१४ रोजीचे ई-मेल व्दारे सदर Working Element करिता प्रति नग रु. १,४८,१६९/- इतके दर कळविलेले आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | **Working Element Set (Make - Karl Storz) consisting of:**<br>26050 E 1 Working element<br>26050 G 1 Cutting Loop, angled<br>26050 N 1 Coagulating-Electrode, ball end, ø 3 mm<br>26050 NK 1 Coagulating-Electrode, ball end,ø5 mm<br>26050 XH 1 Coagulating Needle Electrode, angled<br>277 2 High Frequency Cord<br>280 1 Protection Tube, for for sterilization and storage of electrodes, curettes and knives Cutting by means of a spring. The thumb support is movable.<br>In rest position the electrode tip is inside the sheath | 01 | 148169.00 | 148169.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **148169.00** |

वरीलप्रमाणे M/s. Karl Storz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. १,४८,१६९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२

(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ. टी. विभागात सध्या असलेला Working Element हा वापरुन खराब झालेला आहे व तो युरोलॉजी शस्त्रक्रियेकरिता आवश्यक आहे, त्यामुळे नवीन खरेदी करणे गरजेचे आहे.

तरी वरील प्रमाणे Working Element विहित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. १,४८,१६९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता आवश्यक असलेले Working Element विहीत पध्दतीने निविदा मागविणेत येऊन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,४८,१६९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१ श्री साईनाथ सगुणोपसना मराठी आरतीचे दराबाबत.**

**प्रस्ताव-** प्रकाशने विभागाकडील साठा संपत आलेली पुस्तके/फोटोंचे पुर्नमुद्रणासाठी ऑनलाईन निविदा प्रपत्रे मागविणेत आली होती. निविदा प्रपत्रासोबत विहित केलेल्या शर्ती/अटीनुसार प्रथम मुदतीअखेर प्राप्त १५ निविदाधारकांचा लिफाफा नं.१ (Technical Bid) मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले व प्री ऑडीटर यांचेकडून कागदपत्रांचे अवलोकन होऊन पात्र निविदाधारकांची यादी तयार करण्यात आली.

१२ पात्र निविदाधारकांचा ऑन लाईन लिफाफा नं.२ (Commercial Bid) दि.१७.०७.२०१४ चे मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडणेत आलेत,पात्र १२ निविदाधारकांपैकी ८ निविदाधारकांनी २५ प्रकारचे पुस्तके व ४ प्रकारचे फोटोंचे न्युनतम दर भरलेले आहेत, त्यांचे नमुद केलेल्या दरापेक्षा काही प्रमाणात दर कमी करतील का ? याबाबत खात्री करणेकामी दि.२४.०७.२०१४ रोजी सायंकाळी ६.०० वा शिर्डी येथे मा.उपसमितीचे सभेत प्रेसधारकांना बोलाविण्यात आले होते.

मा.उपसमितीचे सभेत दर कमी करणेबाबतचे चर्चेचेवेळी लोकमंगल प्रिंट पॅक लि.,सोलापूर यांनी श्री साईनाथ सगुणोपासना आरती मराठी या पुस्तकाचा दर नजरचुकीने ऑनलाईन भरतांना रु.३.९० पैसे ऐवजी १.९० पैसे असी टायपिंग चूक झाल्यामुळे ऑनलाईन दरपत्रकात भरला गेला आहे. असे मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले. मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी मागिल आरतीचा छपाई दर किती आहे याबाबत विचारणा केली असता, श्री साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा छपाई दर रु.४.९५ पैसे असा आलेला आहे. मागिल दरापेक्षा सदरचा दर कमी असून ही नजरचुकीने टायपिंगची चूक झाल्याने चुकीचा दर रु.१.९० पैसे ऑनलाईन भरला गेला आहे.

लोकमंगल प्रिंट ऍन पॅक लि., सोलापूर यांनी दि.२६.०७.२०१४ रोजीचे पत्रात श्री साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा दर ऑनलाईन भरतांना ३.९० पैसे ऐवजी टायपिंग चूक झाल्यामुळे १.९० पैसे असा झाला आहे. सदर दर रु.१.९० पैसे ऐवजी रु.३.९० पैसे ग्राह्य धरण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसे पत्र त्यांनी दिले आहे.

दि.२४.०७.२०१४ चे उपसमितीचे सभेत लोकमंगल प्रिंट ऍन पॅक लि., सोलापूर यांनी मा.उपकार्यकारी अधिकारी यांना चर्चेअंती श्री साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा दर रु.१.९० पैसे ऐवजी रु.३.९० पैसे ग्राह्य धरणेबाबत सुचित करुन सदर दरावर ४% डिस्काऊन्ट देऊन रु.३.७५ पैसे प्रमाणे छपाई काम द्यावे अशी विनंती केली असता. मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे आदेश देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

सबब लोकमंगल प्रिंट ऍन पॅक लि., सोलापूर यांचे दि.२४.०७.२०१४ चे उपसमितीचे सभेत चर्चेअंती श्री साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा ऑनलाईन भरलेला दर रु.१.९० पैसे ऐवजी रु.३.९० पैसे ग्राह्य धरणेस व सदर दरावर ४% डिस्काऊन्ट देऊन रु.३.७५ पैसे या न्यूनतम दरामध्ये छपाईचे काम लोकमंगल प्रिंट ऍन पॅक लि., सोलापूर यांचेकडून करुन घेणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६६० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ सगुणोपसना मराठी आरती पुस्तके छपाईकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, फेर निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **कार्डीयालॉजिस्ट डॉ.बजाज व डॉ.वर्मा, यांचे अनियमित वैद्यकीय उपचार व त्यांचेवर असलेल्या गंभीर आरोपांसंबंधित प्राथमिक चौकशी अहवाल.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीने दि.१५.०३.२०१४ रोजी डॉ. हरीष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांना पुढील आदेश होईपर्यंत इन्सेंटीव्ह देण्यात येऊ नये असे ठरविले आहे. त्यास अनुसरुन माहे फेब्रुवारी २०१४ पासुन या डॉक्टरांना इन्सेंटीव्ह देण्यात आलेला नाही. हॉस्पिटलमध्ये या डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त Incentive देण्यात येत होता. इन्सेंटीव्ह देण्याचे सर्वाधिकार मा.व्यवस्थापन समितीला आहेत व डॉक्टरांना देण्यात आलेल्या नियुक्ती आदेशामध्ये इन्सेंटीव्ह देण्याचे नमुद केलेले नाही.

डॉक्टरांच्या अनियमीत/अवैध कामकाजाची व त्यांचेवर असलेल्या आरोपांसंबंधित प्राथमिक चौकशी करणेबाबत दि.२६/०७/२०१४ रोजी मा.कार्यकारी, उप कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व वैद्यकीय संचालक यांची चर्चा झाली. चर्चेअंती वैद्यकीय संचालक यांनी त्यांचा प्राथमिक चौकशी अहवाल घ्यावा असे ठरले होते. त्यास अनुसरुन डॉ. हरीष बजाज व डॉ. गौरव वर्मा, कार्डीयालॉजिस्ट यांचे वैद्यकीय उपचाराचे कामकाज संशयास्पद असल्याचे व त्यांचेवर खालील गंभीर आरोप असल्याचे प्रथमदर्शनी चौकशीत दिसुन येते.

१. अँन्जीओग्राफी, अँन्जीओप्लास्टी, एएसडी Device, PDA Device, व्हिएसडी Device इ. ऑपरेशन/ प्रोसिजर्स् करण्यापुर्वी रुग्णांच्या काही तपासण्या करणे आवश्यक असते. तथापि, रुग्णांची संख्या वाढण्यासाठी त्या तपासण्या न करता थेट ऑपरेशन/प्रोसिजर्स केल्या जातात. उदा. बीपी पाहणे, ईसीजी करणे, टीएमटी, स्ट्रेस टेस्ट करणे, काही लॅब तपासण्या इ.
२. डिव्हाईस, स्टेंट, इम्लान्टस् वापराची संख्या वाढविण्यासाठी अँन्जीओग्राफीत ब्लॉक नसतांना प्रोसिजर्स/ ऑपरेशन्स करणे.
३. पॅकेज मध्ये नमुद असलेल्या कालावधीपेक्ष कमी कालावधीमध्ये डिसचार्ज केल्यामुळे काही रुग्ण दगावतात व अशा रुग्णांच्या नातेवाईकांच्या तक्रारी येतात.
४. या डॉक्टरांकडुन ऑपरेशन करुन गेलेले रुग्ण खराब होऊन उपचारासाठी आल्यानंतर त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्याऐवजी बेड नसल्याचे कारण सांगुन त्यांना इतरत्र रुग्णालयांकडे रेफर करतात अथवा स्वतः कडे अॅडमिट न करता दुसऱ्या डॉक्टरांकडे अॅडमिट करण्याचा सल्ला देतात व त्यांची तपासणी सुध्दा करत नाही.
५. स्वतः ओपीडीमध्ये रुग्णांची तपासणी न करता त्यांनी अनाधिकृतपणे नेमलेल्या तथाकथीत खाजगी पीए मार्फत वैद्यकीय उपचारासंबंधित सर्व कामे करणे.
६. रितसर अॅडमिशन करण्यापुर्वी अशाप्रकारे ऑपरेशन केलेल्या रुग्णांना थेट डिसचार्ज देवुन त्यांचेकडुन परस्पर चार्जेस घेण्यासाठी या डॉक्टरांनी स्वतःचे प्रायव्हेट पी.ए. नियुक्त केले होते. रुग्णांनी पावती न मिळल्याची तक्रार केल्यास त्यानंतर हे पीए बिलींग विभागात रुग्णांचे अॅडमिशन करुन रक्कम भरतात व तात्काळ काही तासात डिसचार्ज करतात.
७. ऑपरेशन नंतर रुग्णांस विशिष्ट दिवस अॅडमिट करुन त्यांची सुश्रुषा करणे गरजेचे असते, तथापि रुग्णांची संख्या वाढविण्याच्या उद्देशाने रुग्णांना कमी वेळेत डिसचार्ज करणे व दुसऱ्या रुग्णांना त्या जागी अॅडमिट करणे.
८. रुग्णांचे अॅडमिशन करण्यासाठी बेड उपलब्ध नसतांना रितसर अॅडमिशन करण्यापुर्वीच त्यांच्या अॅन्जीओग्राफी ऑपरेशन करतात व रुग्णांना स्ट्रेचरवरच झोपुन ठेवतात व नावाला अॅडमिशन पेपर करुन तात्काळ डिसचार्ज करतात.
९. पेसमेकर, डिव्हाइस इ. कन्झुमेबल मटेरीयल रुग्णांस वापरण्यासाठी संबंधित कंपन्यांकडुन प्रति नग अनाधिकाराने विशिष्ट रक्कम कमिशन म्हणुन घेणे.
१०. तसेच ऑपरेशनसाठी लागणारे स्टेंट, बलुन्स इ. मटेरीयल रुग्णांस वापरण्यासाठी संबंधित कंपन्यांकडुन प्रति नग अनाधिकाराने विशिष्ट रक्कम कमिशन म्हणुन घेणे.
११. अनाधिकारे रक्कम कमविण्याच्या उद्देशाने फॉलो-अपसाठी आलेल्या रुग्णांकडे कमी लक्ष दिले जाते व नवीन रुग्णांकडे जास्त लक्ष देतात, त्यामुळे पुर्वी ऑपरेशन करुन गेलेल्या रुग्णांना ऑपरेशन नंतरची सेवा उत्तम प्रकारे देत नाही.
१२. संस्थान कर्मचारी रुग्ण असल्यास सखोल तपासणीऐवजी ईसीजी, टुडी-ईको इ. तपासण्या रिपोर्ट नॉर्मल असल्याचे सांगणे, कारण यावर त्यांना प्रति केस इन्सेंटीव्ह मिळत नाही. त्यामुळे संस्थान कर्मचाऱ्यांना आवश्यक सेवा देण्यात टाळाटाळ करतात.

१३. ऑपरेशन झालेल्या रुग्णांचे ऑपरेटीव्ह राऊंड घेण्याकडे दुर्लक्ष करतात. जास्त रुग्ण वाढविण्याच्या उद्देशाने ऑपरेटीव्ह पेशंटकडे दुर्लक्ष केले जाते.

१४. रुग्णांची संख्या वाढवुन जास्तीत जास्त इन्सेंटीव्ह व अनाधिकाराने कमिशन रक्कम कमविण्याच्या उद्देशाने बाहेरील डॉक्टरांना कट (कमिशन) पध्दती त्यांनी अवलंबिली आहे.

१५. स्टेंट पुरवठादारांकडे रितसर किंमत कमी करण्याची मागणी केल्यास पुरवठादारांनी किंमती कमी करु नये व त्यांना मिळत असलेली रक्कम कमी स्विकारली जाणार नाही असे पुरवठारांना सांगतात. त्यामुळे नाईलाजास्तव संस्थानला स्टेंटस्, डिव्हाईससाठी जास्त किंमत मोजावी लागुन आर्थिक नुकसान होते.

१६. कॅथलॅब टेक्निशियन यांना स्वतःच्या वतीने संबंधित कंपन्याकडे कमिशन मागण्याकरीता व वसुलीकरीता दबाव आणतात.

१७. प्रोसिजर्स/ ऑपरेशन झालेल्या रुग्णांना डिसचार्ज करण्यापुर्वी टुडी-ईको करणे आवश्यक असतांना टुडी-ईकोची तपासणी न करता रिपोर्ट रुग्णांच्या आयपीडी फाईलमध्ये लावले जातात.

१८. जास्तीत जास्त कमिशन देणाऱ्या पुरवठादारांचे स्टेंट वापरतात. पुरवठादारांनी किंमत कमी करतांना आमचा स्टेंट वापराची शाश्वती म्हणुन सर्व पुरवठादारांचे समान स्टेंट वापरावेत अशी अट समक्ष मान्य करुन त्याचे पालन करत नाही व विशिष्ट कंपन्यांचेच स्टेंट वापरतात.

पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.**

Dr. R.V. Rao, In-charge Medical Director, is hereby appointed as an Enquity Officer to enquire into the allegations against Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

At first instance, Dr. R.V. Rao, Enquiry Officer shall issue show cause notice about irregularities, lapses and misconduct prima facie committed by Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma.

After receipt of the reply from the Doctors concerned, within reasonable period, Dr. R.V. Rao shall proceed to conduct further inquiry, if the charges are not accepted, by framing appropriate charges etc. under delegated authority of the Managing Committee, till enquiry is completed and final report to the Managing Committee about findings of facts in respect of charges against the Doctors is submitted, within one month. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.६११ ते ६६१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सकाळी ११.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (कुंदनकुमार सोनवणे) | (शशिकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी